।। श्री दत्तपुराण ।।

।। अथोपासनाकाण्डं ।। तृतीयाष्टक प्रारम्भः ।।

।। अथोपासनाकाण्डे उपासनाविधिनिरूपणं नाम तृतीयाष्टके प्रथमोऽध्यायः ।।

ॐ ।। श्रीः ।।

प्रयतेः सुलभो भक्त्याऽयमात्मा पुरुषः परः ।।
इति वेदादिनोक्तं तद्भक्तिर्मुख्याऽधुनोच्यते ।।१।।
निर्विकल्पं परं ब्रह्म साक्षात्कर्तुमनीश्वर : ।।
ये मन्दास्तेऽनुकम्प्यन्ते सविशेषनिरूपणैः ।।२।।
वशीकृते मनस्येषां सगुणब्रह्मशीलनात् ।।
तदेवाविर्भवेत्साक्षादपेतोपाधिकल्पनम् ।।३।।
इत्युक्तेर्नवधा भक्तिर्वाच्यात्र स्मरणात्मिका ।।
श्रेष्ठाथ्योन्यत्र च व्याप्ता हृच्छुध्यास्य पदप्रदा ।।४।।
सहस्राङ्गत्मकर्माख्यभगवत्स्मरणात्सदा ।।
कृतं कर्माप्यकर्मैव येनैष द्राग्विमुच्यते ।।५।।
कृतेश्वरे परां भक्तिं भगवत्कीर्तनादपि ।।
सद्भक्तो मायिकं पाशं छित्वा याति स सद्गतिम् ।।६।।
तद्गुणश्रवणाच्चापि श्रद्धावानबहिर्मुख : ।।
सभाहितोऽनसूयुर्ना क्षिप्रं नैष्कर्म्यसिद्धिभाक् ।।७।।

अर्थ : या अध्यायांत उपासनाकांडाची सुरवात झालेली आहे. तिसऱ्या अष्टकापासून सहाव्या अष्टका अखेरपर्यंत म्हणजे संपूर्ण चार अष्टके उपासनेची विविध माहिती वर्णिली आहे. ग्रंथकार (श्रीमत् प० प० वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज) पुढील विषयाचे वर्णन करतांना सांगतात—तो परपुरुष म्हणजे परमात्मा व्यापक आहे. त्याची भक्ति अनन्य रीतीनें करूनच तो प्राप्त होतो. कैवल्याकरतां प्रकर्षानें प्रयत्न करावा. त्यासच प्रयति असें म्हणतात.

त्यायोगानें हा अपरोक्ष साक्षात्कारी परमात्मा सुलभपणें प्राप्त होतो. ज्ञान व कर्म यांना जोडणारा राजमार्ग म्हणजे भक्तिमार्ग. " पत्रं पुष्पं फलं तोयं " इत्यादि स्मृतिवचनांनीं भक्तिमार्गाचे विशेष वर्णन केले आहे. परंतु " ज्ञात्वा देवं सर्वपाशाद्विमुक्तिः " " ब्रह्मविदाप्नोति परं " इत्यादि वचनांवरून ज्ञानामुळेंच मुक्ति मिळते, अन्य साधनांनी नाहीं, अशा प्रकारचा सिद्धांत ऐकण्यांत येतो. मग भक्तिचा उपयोग काय ? अशा प्रकारची शंका घेऊन ग्रंथकार उत्तरादाखल श्लोक २ पासून भक्तिमार्गाचे साधार व महत्वपूर्ण विवरण करतात. निर्विकल्पक व चिदानंद परब्रह्माचा साक्षात्कार करवून घेण्यास जे लोक असमर्थ असतात, अशा मंद म्हणजे सर्वसामान्य लोकांवर कृपा करण्यासाठी येथे सगुण परमेश्वराच्या भक्तिचे निरूपण केलें आहे. येथें मंद या शद्बाचा अर्थ, " निर्विकल्प समाधियोगाचा अभ्यास पूर्ण न झालेला " असा घ्यावयाचा आहे. दुसरें असें, कीं मंदांकरताच हा उद्योग आहे असें नव्हे, तर " मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।। श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः " या उक्तीनें स्मृतींमध्येंही सगुणोपासकाचें युक्तत्व वर्णिलेलें असल्यानें, तसेंच " क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।। अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते " निर्गुणोपासकाचें कष्टतमत्व सांगितलेलें असल्यानें, सगुणोपासन सर्वांनाच आदरणीय आहे. सगुण ब्रह्माच्या उपासनेनें मन वश केल्यानंतर निर्गुणाचाच साक्षात्कार होऊन खोट्या कल्पनांचा निरास होतो. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, हे भक्तीचे नऊ प्रकार आहेत. ही नवविधा भक्ति श्रेष्ठ, फलदायी आहे. तिनें हृदयाची शुद्धि होते. आणि तिच्यामुळे वैकुंठपदाची प्राप्ती होते. कीर्तनादींमध्ये तिचें वर्णन केलेलें आहे. परमेश्वराची सहस्र अंगे, नांवें, व कर्में आहेत. अशा भगवंताच्या सतत स्मरणांत केलेलें कर्महि अकर्मच होऊन रहातें व तात्काल मुक्ति मिळते. भगवंताचे गुणवर्णन, कीर्तन या रूपानें भक्ति करूनही सद्भक्त मायिक पाश तोडून सद्गतीस जातो. श्रद्धावान, अंतर्मुख म्हणजे अंतर्निष्ठ, समाहित, दुसऱ्याचा द्वेष न करणारा असा मनुष्य परमेश्वराच्या गुणश्रवणानेंदेखील नैष्कर्म्य सिद्धी मिळवितो.

वज्राङ्कुशध्वजाब्जाङ्कभगवत्पादसेवनात् ॥
भित्वा मायावृतिं सत्त्वशुद्धो याति परं पदम् ॥८॥
जलेष्टास्रं कनिष्ठिक्या लिखित्वा तारमन्तरे ॥
पत्रेष्वष्टाक्षरं चैकं हृत्स्थमावाह्य तत्र षट् ॥९॥
प्रदर्श्य मुद्रा ऋष्यादीन्स्मृत्वा विन्यस्य चोंकृते ॥
मात्राः शाखाङ्गेषु मूखवाताग्न्यब्वीजतो हृदा ॥१०॥
दत्वोपचारान्गन्धादीन् जपित्वाऽष्टसहस्रकम् ॥
तर्पयित्वा चाष्टशतमृष्यादीनेकवारतः ॥११॥
पुनः संपूज्य विन्यस्य तं स्वात्मन्युद्वसेत्परम् ॥
त्रिसंध्यमर्चनं त्वेवं यतेरन्यस्य चोच्यते ॥१२॥
लब्ध्वा पूर्वं स्वगृह्योक्तं द्विजत्वं भक्तिमाञ्छुचिः ॥
ज्ञात्वा धनर्णसिद्धारिचिक्रासिद्धं मनुं गुरोः ॥१३॥
लब्ध्वाऽर्णसंख्यालक्षां प्राक् पुरश्चर्यां यथाविधि ॥
कृत्वाऽनेनार्चयेदर्चां नियतो नित्यकर्मकृत् ॥१४॥
लौहीं वा संस्कृतां शैलीं विभोः साश्रां सलक्षणाम् ॥
सोऽपि लब्ध्वाखिलान्कामान्देहान्ते तन्मयो भवेत् ॥१५॥

अर्थ : वज्र, अंकुश, ध्वज, कमलपुष्प इत्यादि शुभचिन्हांनी युक्त असलेल्या भगवत्पदाची सेवा केली असता मायेचे चक्र तोडून, सत्वशुद्ध असा मनुष्य परंपदाला जातो. आतां मानसपूजा प्रकार सांगितला आहे. जलामध्यें स्वतःच्या करंगळीनें अष्टदलयुक्त कमल काढावें. त्याच्या प्रत्येक पाकळीवर करंगळीनें ॐ लिहावे. नंतर ' ॐ नमो नारायणाय ' या अष्टाक्षरी मंत्राचे एक एक अक्षर एकेका पाकळीवर लिहावें. ब्रम्ह एकच आहे. मी व तें अभिन्न आहोत अशी भावना करावी. त्याच एकात्मस्वरुप नारायणाचें कमलपत्रावर आवाहन करावें. नंतर सहा प्रकारच्या मुद्रा दाखवाव्यात. त्या अशा— १) शंखमुद्रा २) चक्रमुद्रा, ३) गदामुद्रा, ४) पद्ममुद्रा, ५) धेनुमुद्रा, ६) गरुडमुद्रा. ह्या

मुद्रा देवांना फार आनंद देतात. ॐकाराचा अंतर्यामी भगवान् हा ऋषी आहे. परमात्मा देवता आहे, देवी गायत्री छंद आहे असें स्मरावें. नंतर अं उं मं असें म्हणून अंगुलीन्यास, हृदयन्यास करावा. तदनंतर भूमि, आकाश, वायु, अग्नि, जल यांच्या बीजमंत्रांनी, म्हणजे ' लं गंधं समर्पयामि, हं पुष्पं समर्पयामि, यं धूपं समर्पयामि, रं दीपं समर्पयामि, वं नैवेद्यं समर्पयामि' असें मनानें उच्चारून मानसपूजा करावी. तदनंतर एक हजार आठ वेळां प्रणवजप करावा. तदनंतर ' ॐ तर्पयामि ' या पद्धतीनें एकशेआठ वेळां तर्पण करावें. ऋष्यादिकांचे तर्पण मात्र एकवार करावें. तदनंतर पुन्हा पूर्वीप्रमाणें मानसोपचार देऊन पूजा करावी. आणि स्वात्म्याचें ठिकाणीं विसर्जन करून पूजेचा समारोप करावा. याप्रमाणें त्रिकाल अर्चन करावें. संन्याशांनीं व इतरांनीही ही मानसपूजा करावी. स्वगृह्योक्त द्विजत्व प्राप्त झाल्यानंतरच वैदिक कर्म करण्याचा अधिकार असतो. उपनयन संस्कार झालेल्या भक्तिमान शुद्ध साधकानें श्रद्धेनें गुरूंचा म्हणजे स्वतःच्या इष्टदेवतेचा मंत्रजप करावा. जपाचें पूर्वी धन, ऋण, सिद्ध, अरि इत्यादी चक्रांवरून मंत्रजपाची सिद्धी कशाप्रकारें मिळणार आहे तें पहावें. मंत्रसिद्धि सिद्धारि चक्रावरून पाहण्याची पद्धति थोडक्यांत खालील प्रमाणे दिली आहे.— अ, क, च, ट, त, प, य, श, हे वर्ग घ्यावयाचे आहेत. म्हणजे १२ स्वर व ३६ व्यंजनें घ्यावयाची. प्रथम स्वतःच्या नांवाचे आद्याक्षर घ्यावे. तदनंतर ते अक्षर ज्या वर्गांतील असेल त्या. वर्गातील अक्षरांच्या दुप्पट अक्षरे घ्यावी. त्यानंतर मंत्रदेवतेच्या नांवाच्या आद्याक्षरवर्गाच्या संख्येत ती दुप्पट केलेली संख्या मिळवावी. आलेल्या संख्येस आठानें भागावें. शिल्लक राहिलेली संख्या बाजूस मांडून ठेवावी. नंतर देवाच्या नांवाचे आद्याक्षर घेऊन, ते ज्या वर्गांतील असेल त्यातील अक्षर संख्या दुप्पट करावी. त्या संख्येत जपकर्त्या यजमानाच्या नावाच्या आद्याक्षरवर्गाची संख्या मिळवून आलेल्या बेरजेस आठानें भागावें. भागाकारानंतर येईल ती शिल्लक, व पूर्वी आलेली शिल्लक यांत मोठी संख्या कोणती आहे तें पहावे. संख्येच्या अधिकतेनुसार ऋणी, सिद्ध, साध्य, अरि असें ठरवावें. हें ठरविण्याकरतां चक्राच्या संख्येप्रमाणे पुन्हापुन्हा संख्येची गणना करावी. जपकर्त्या यजमानाचे व्यावहारिक नांव किंवा नाक्षत्र नांव या दोन्हीपैकीं कोणतेही एक घ्यावयाचें आहे. याप्रमाणें देवाच्या इष्टमंत्रा-

ऱ्याक्षरापर्यंत सिद्ध, साध्य, सुसिद्ध, अरि, अशा प्रकारच्या क्रमांनीं पुन्हापुन्हा गणना करून समजाऊन घ्यावयाचें आहे.

सिद्ध सिद्धयति कालेन, साध्यः सिद्धति वा न वा ॥
सुसिद्धो ग्रहणादेव ह्यरिर्मूलं निकृंतति ॥

अर्थ : सिद्ध मंत्र काही कालाने सिद्ध होतो. साध्य मंत्र सिद्ध होईल वा न होईल. सुसिद्ध तात्काल सिद्ध होतो, आणि अरिमंत्र पाळेंमुळे खणून काढतो. तदनंतर जपमंत्रातील अक्षरांच्या प्रमाणाप्रमाणें म्हणजे एका अक्षरास एक लक्ष इतका मंत्र जपावा. म्हणजे एक पुरश्चरण होते. (श्रीदत्तमालामंत्रजपास हा नियम लागू नाही.) जपानुष्ठान मूर्तिपूजेच्या आधीं करावे. पुरश्चरणानंतर जपाची सिद्धी मिळते. पूजेचे पूर्वी नित्यकर्मानुष्ठान करावें. पूजेची मूर्ती लोखंडाची तांब्याची, पितळेची, दगडाची, सोन्याची, चांदीची अथवा पंचधातुचीं असावी. मूर्ति सायुध व सलक्षण असावी. पूजा शास्त्रविहित मंत्रांनीं करावी, म्हणजे पूजकाच्या सर्व कामना पूर्ण होतात, व तो देहपातानंतर तन्मयस्वरूप होऊन जातो.

पुरा नारायणं ब्रह्मा सत्यक्षेत्रे दयानिधिम् ॥
प्रणतोऽपृच्छदेकं किमुपास्यं दैवतं परम् ॥१६॥
स प्राह मामकं धाम यद्दत्तात्रेयसंज्ञितम् ॥
सदानन्दात्मकं शुद्धं सात्त्विकं तारकं परम् ॥१७॥
विश्वरूपं जगद्योनिं तदेवोपास्व दैवतम् ॥
दकारं वह्निसंयुक्तं सतुण्डाक्षरबिन्दुकम् ॥१८॥
तदर्चने मनुं विद्धि छन्दो गायत्रिकास्य च ॥
सदाशिव ऋषिर्देवो दत्तात्रेयश्चतुर्भुजः ॥१९॥
मनुरेकाक्षरोऽस्थायं जाप्यो गर्भादितारणः ॥
तारःश्रीदुर्गा क्रों भूमिदत्तैकाक्षरयुङ्मनुः ॥२०॥
षडक्षरो योगदोऽयं सर्वसंपत्समृद्धिकृत् ॥
ऋष्यादिः पूर्ववन्न्यासो बीजैः शाखा हृदादिषु ॥२१॥

अर्थ : वरील माहिती स्पष्ट करण्यासाठीं तापिनी नांवाच्या उपनिषदातील मंत्राची माहिती ब्रह्मा विष्णु संवादरूपानें दिली आहे ती सांगतात. पूर्वी दयानिधी अशा नारायणापुढें ब्रह्मलोकांत ब्रह्मदेवानें नम्रप्रणामयुक्त असा प्रश्न केला की, " प्रमुख असें उपास्य दैवत कोणतें ? " त्यावर नारायणानें उत्तर दिलें, दत्तात्रेय नांवाचें दैवत हे माझेच स्थान आहे. ते सदानंदात्मक, शुद्ध, सात्विक व परम श्रेष्ठ आणि तारक आहे. तेच विश्वरूप, जगदुत्पत्तिस्थान असून त्याच दैवताची उपासना कर. त्याच्या उपासनेचा एकाक्षरी मंत्र सांगितला आहे तो असा – प्रथम रवर्णयुक्त दकार घ्यावा. नंतर बिंदुयुक्त तुंगक्षर म्हणजे 'आं' त्यास जोडावे. म्हणजे 'द्रां' असा एकाक्षरमंत्र तयार होतो. या मंत्राचा सदाशिव ऋषि आहे. ही दत्तात्रेय देवता चतुर्भुज आहे. ह्या देवतेचा 'द्रां' हाच एकाक्षरी मंत्र आहे. ह्या मंत्राचा जप केला असता गर्भावस्थेपासून रक्षण होतें. या मंत्राचे जपानुष्ठान करण्यासाठीं साधकाने संकल्प करावा तो असा–'अस्य श्रीदत्तात्रेय एकाक्षरमंत्रस्य सदाशिवऋषिः गायत्रीच्छंदः श्रीदत्तात्रेयोदेवता द्रां बीजं नमः शक्तिः दत्तात्रेयेति कीलकं श्रीभगवान् दत्तात्रेय देवता प्रसादसिद्ध्यर्थं जपे विनियोगः." तदनंतर षडंगन्यास करावा तो असा– ॐ द्रां हृदयाय नमः ॐ द्रीं शिरसे स्वाहा ॐ द्रूं शिखायै वषट् ॐ द्रैं कवचाय हुं ॐ द्रौं नेत्रत्रयाय वौषट् ॐ द्रः करतलपृष्ठाभ्यां नमः अस्त्राय फट् इति दिग्बंधः " याप्रमाणें न्यास करून तदनंतर आराध्य श्रीदत्तात्रेय देवतेचे ध्यान करावें आणि यथासंभव व अभिष्टसंख्याक 'ॐ द्रां ॐ' या मंत्राचा जप करावा. जप झाल्यावर पूर्वीप्रमाणें षडंगन्यास करून अनुष्ठान समाप्त करावें.

मंत्रप्रकार दुसरा— 'ॐ श्रीं ह्रीं क्रों ग्लौं द्रां' हा षडक्षरी मंत्र आहे. ह्याच्या जपानुष्ठानानें योग मार्गाचे ज्ञान चांगले होतें. त्या शिवाय या मंत्र जपानें सर्व प्रकारची संपत्ती व ऋद्धिसिद्धि यांचा लाभ होतो. ऋषि, छंद व देवता पूर्वीप्रमाणेच घ्यावयाच्या आहेत. बीजमंत्रानें षडंगन्यास व करांगुलीन्यास करावयाचा आहे. संकल्पाचा प्रकार असा आहे– 'अस्य श्रीदत्तात्रेयदेवताषडक्षरमंत्रस्य सदाशिव ऋषिः गायत्री छंदः चतुर्भुज श्रीदत्तात्रेयदेवता सर्वाभीष्टसिद्धिपूर्वक सर्वारिष्टशांत्यर्थे जपे विनियोगः' 'ॐ श्री ह्रीं क्रों ग्लौं द्रां' या मंत्राचा जप साधकानें इष्टसंख्याक करावा.

जपापूर्वी व नंतर आराध्य श्रीदत्तात्रेय देवतेचे ध्यान करावें. ध्यानाचा प्रकार येणेप्रकारे सांगितला आहे.

दत्तात्रेयं शिवं शान्तमिन्द्रनीलनिभं विभुम् ॥
आत्ममायारतं देवमवधूतं दिगम्बरम् ॥२२॥
भस्मोद्धूलितसर्वाङ्गं जटाजूटधरं विभुम् ॥
चतुर्बाहुमुदाराङ्गं प्रफुल्लकमलेक्षणम् ॥२३॥
ज्ञानयोगनिधिं विश्वगुरुं योगिजनप्रियम् ॥
भक्तानुकंपिनं सर्वसाक्षिणं सिद्धसेवितम् ॥२४॥
इत्यौपनिषदं दत्तं ध्यात्वैकाग्र्यं मनुं जपेत् ॥
स वाञ्छितफलं भुक्त्वा परत्र श्रेय आप्नुयात् ॥२५॥

अर्थ : श्रीदत्तात्रेय देव हा कल्याणप्रद, सर्व कल्याण करणारा, शांतस्वरूप, असून त्याची कांती इंद्रनील मण्याप्रमाणें निळसर आहे. तो व्यापक असून आत्ममायारत आहे. तो देव (देवनशील) म्हणजे तेजस्वी आहे, अवधूत व दिगंबर आहे. त्याचें सर्वांग भस्मविभूषित आहे. डोक्यावर त्यानें जटाभार धारण केला असून तो विभु आहे. तो चतुर्बाहु असून त्याचें सर्वांग सुंदर, विलोभनीय, प्रसन्न असें आहे. त्याचें नेत्र पूर्ण विकसित कमल पुष्पाप्रमाणें विशाल, आरक्त व सुंदर आहेत. तो ज्ञान व योग यांचा पूर्णसागर आहे. तो अखिल विश्वाचा, जडमूढ जीवांचा मार्गदर्शक सद्गुरू आहे, योगिजनप्रिय आहे. तो भक्तांवर पूर्ण कृपा करणारा असून चराचर जगताचा साक्षी आहे. सिद्ध, साध्य व गंधर्व त्याची सेवा करतात. वरील प्रमाणें उपनिषदांत वर्णिलेल्या श्रीदत्तात्रेय प्रभूंचे ध्यान करून एकाग्रचित्ताने श्रीदत्त मंत्राचा जप करावा. त्या अनुष्ठानानें मुमुक्षु साधकाचें सर्व मनोरथ पूर्ण होतात.

सैकाक्षरं चतुर्थ्यन्तं दत्तात्रेयं नमोन्वितम् ॥
अष्टार्णमन्त्रं गायत्रं विद्धि द्रां बीजमस्य तु ॥२६॥
चतुर्थी कीलकं शक्तिर्नम आर्षः सदाशिवः ॥
दत्तात्रेयपदस्यार्थः सत्यानन्दचिदात्मकः ॥२७॥

प्रह्वीभावो नमोर्थस्तु पूर्णानन्दैकविग्रहः ॥
तारं सबिन्दुं तुण्डार्णं दुर्गा क्रों तुर्यमीह च ॥२८॥
दत्तात्रेयेति संबुद्ध्या स्वाहान्तं द्वादशाक्षरम् ॥
सर्वकामदुघं विद्धि गायत्रं भो शिवार्षकम् ॥२९॥
वराभयदहस्तं यो भजेदाभ्यां महाव्रतः ॥
सर्वान्कामानिहैवाप्त्वा सोऽमृतो भवति ध्रुवम् ॥३०॥

अर्थ : प्रकार–३ पूर्वी सांगितलेला एकाक्षर मंत्र 'द्रां' घेऊन 'दत्तात्रेय' शब्दाची चतुर्थी 'दत्तात्रेयाय' अशी करून 'नमः' हा शब्द शेवटी जोडून "द्रां दत्तात्रेयाय नमः" हा अष्टाक्षर मंत्र तयार होतो. या मंत्राचे 'द्रां' हे बीज, 'नमः' ही शक्तिः 'दत्तात्रेयाय' हे कीलक आहे. 'दत्तात्रेय' पदाचा अर्थ 'सत्यानन्दचिदात्मक' असा आहे. 'नमः' याचा अर्थ प्रह्वीभाव, नम्रता असा आहे. या अष्टाक्षर मंत्राचा संकल्प प्रकार असा– "अस्य श्रीदत्तात्रेय अष्टाक्षर मंत्रस्य सदाशिवऋषिः गायत्रीछन्दः दत्तात्रेयो देवता सर्वारिष्ट शान्त्यर्थसकलमनोरथसिद्धि पूर्वक समस्त मंगलावाप्तये च श्रीदत्तात्रेय सद्गुरुदेवताप्रीत्यर्थं जपे विनियोगः"- यानंतर द्वादशाक्षरी मंत्र सांगितला आहे. हा मंत्रप्रकार ४–नित्याप्रमाणे स्नान नित्यकर्मानुष्ठान करून शुचिर्भूत व्हावे, व संकल्प करावा. "अस्य श्रीदत्तात्रेयद्वादशाक्षरमंत्रस्य श्रीसदाशिवऋषिः गायत्री छंदः श्रीदत्तात्रेयोदेवता श्रीदत्तात्रेय प्रसाद सिद्ध्यर्थं सर्वारिष्टशांत्यर्थं च जपे विनियोगः." संकल्प झाल्यानंतर "ॐ आँ ह्रीं क्रों एहि दत्तात्रेय स्वाहा" हा द्वादशाक्षरी मंत्र जपावा ह्या मंत्राचे 'ॐ' हे बीजं आहे, 'स्वाहा' शक्ति आहे. 'दत्तात्रेय' कीलक आहे. ॐ बीजं स्वाहा शक्तिः दत्तात्रेयेति कीलकं ॐ ॐ आं हृदयाय नमः, ॐ ह्रीं क्रों शिरसे स्वाहा ॐ एहि शिखायै वौषट् ॐ दत्तकवचाय हुं ॐ आत्रेय नेत्राभ्यां नमः ॐ स्वाहा अस्त्राय फट्. तदनंतर वरील क्र. २२ ते २४ क्रमांकाच्या श्लोकांतील मंत्रांनी श्रीदत्तात्रेयांचे ध्यान करावे. वरील दोन्ही मंत्र (म्हणजे अष्टाक्षरी व द्वादशाक्षरी) सर्व कामना पूर्ण करणारे आहेत. सदाशिव ऋषि व गायत्री छंद त्यात आहेत. वरदहस्त

अशा श्रीदत्तात्रेयांचे दृढभक्तीनें आराधना करणाऱ्या साधकांच्या सर्व कामना पूर्ण होतात व ते तात्काल अमृतस्वरुप होतात.

ॐ बीजं स्वाहात्र शक्तिः संबुद्धिः कीलकं क्रमात् ॥
द्वाभ्यां हृदि च के द्वाभ्यां शिखायां क्रियया न्यसेत् ॥३१॥
संबुद्धिभ्यां स्कन्धचक्षुर्द्वयेऽस्त्रेन्त्येन तन्मयः ॥
चतुर्बीजैः सक्रियाख्यान्त्याभ्यां न्यासं करादिषु ॥३२॥
कृत्वा यजेद्देवदेवं यन्त्रन्यस्तमभीष्टदम् ॥
दत्तात्रेय हरेकृष्ण उन्मत्तानन्ददायक ॥३३॥
दिगम्बर मुने बाल पिशाचज्ञानसागर ॥
आनुष्टभः शिवार्षोऽयं षड्भुजात्रेयदैवतः ॥३४॥
द्वाभ्यां द्वाभ्यां हृच्छिरसोः शिखायामेकतो गले ॥
द्वाभ्यामेकैकेन दोर्द्वन्द्वये द्वाभ्यां तथास्त्रके ॥३५॥
विन्यस्य जपिता दोषमुक्तः सर्वोपकारकृत् ॥
तारं वायुं क्लां कामं क्लं ह्रां दुर्गां न्हूं च विद्धि सौः ॥३६॥
दत्तात्रेयं चतुर्थ्यन्तं स्वाहान्तं षोडशाक्षरम् ॥
वायुस्थाने तु वाग्बीजं नमोन्ते योजयाथवा ॥३७॥
स्वाहैकत्र नमोऽन्यत्र शक्तिर्बीजं च कीलकम् ॥
तारश्चतुर्थी गायत्री मंत्रराजः शिवोदितः ॥३८॥
हृदि द्वे द्वे त्रीणि शिखायां चैकं कवचे दृशोः
चतुर्थीमन्त्यमस्त्रे च विनस्य जपकामदम् ॥३९॥

अर्थ : यानंतर मंत्रप्रकार ५ सांगतात. षोडशाक्षरी श्रीदत्तमंत्राची माहिती येथे सांगितली आहे. मंत्राचे विविध प्रकार सांगून तदंगभूत हृदयादि न्यास, करन्यास इत्यादींचीं सविस्तर माहिती दिली आहे. "दत्तात्रेय हरेकृष्ण उन्मत्ता- नंददायक ॥ दिगंबर मुने बाल पिशाचज्ञानसागर" हा श्लोक अनुष्टुप् वृत्तात आहे. त्यामुळे त्याचे सोळा अक्षरी पृथक् पृथक् दोन मंत्र होतात.

नेहमीप्रमाणे स्नान व नित्यकर्मानुष्ठान झाल्यावर आसनावर बसून संकल्प करावा. तो असा— अस्य श्रीदत्तात्रेय षोडशाक्षरमन्त्रस्य श्रीसदाशिवऋषिः गायत्रीछन्दः श्रीदत्तात्रेयो देवता श्रीषडभुज दत्तात्रेयदेवता प्रसादप्रीत्यर्थं सर्वा- रिष्टशान्त्यर्थं च जपानुष्ठाने विनियोगः । अस्य मंत्रस्य द्रां बीजं, नमः शक्तिः दत्तात्रेय इति कीलकम्। तदनंतर षडंगन्यास करावा—"ॐ द्रां हृदयाय नमः॥ ॐ द्रां शिरसे स्वाहा। ॐ एहि शिखायै नमः। ॐ दत्तात्रेय इति कवचाय नमः। ॐ दत्ता- त्रेय इति नेत्राभ्यां नमः । ॐ स्वाहा इति अस्त्राय फट् ।" तदनंतर करन्यास करावा— ॐ द्रां अंगुष्ठाभ्यां नमः, ॐ द्रां तर्जनीभ्यां नमः, ॐ एहि इति मध्यमाभ्यां नमः, ॐ दत्तात्रेय इति अनामिकाभ्यां नमः, ॐ दत्तात्रेय इति कनिष्ठिकाभ्यां नमः, ॐ एहि इति करतलकरपृष्ठाभ्यां नमः, ॐ स्वाहा इति अस्त्राय फट्"। ह्या मंत्राची देवता षडभुज दत्तात्रेय आहे म्हणून "माला- कमण्डलुरधः करपद्मयुग्मे०" या श्लोकाने श्रीदत्तात्रेयाचे ध्यान करावे. ध्यानाचे पूर्वी 'दत्तात्रेय हरेकृष्ण उन्मत्तानंददायक' या मंत्रश्लोकांतील अक्षरगणांनीं षडंगन्यास व करन्यास करावा. तो असा— ॐ दत्तात्रेय हृदयाय नमः । ॐ हरे कृष्ण इति शिरसे स्वाहा । ॐ उन्मत्त इति शिखायै नमः । ॐ आनंद- दायक दिगंबर इति कंठे । ॐ मुने इति बाह्वोः । ॐ बाल इति नेत्रयोः । ॐ पिशाचसागर इति अस्त्राय फट्।" याचप्रमाणे करन्यासही करावा. न्यासाचे वेळीं श्लोकातील शब्दमंत्राच्या मागे प्रत्येकी ॐकार दिला आहे. दत्तात्रेय हरे कृष्ण० या षोडशाक्षर श्लोकाचा अर्थ येणेप्रमाणे आहे. हे दत्तात्रेया, हरे कृष्णा, उन्मत्तानंददायका दिगंबरा, मुने, बाल, पिशाच्यज्ञान- सागर ही आठ नावे संबोधन विभक्तीत दिलेली आहेत. याखेरीज आणखी एक षोडशाक्षर मंत्र असा —ॐ यं क्लां क्लीं क्लूं ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं सौः दत्तात्रेयाय स्वाहा । किंवा षोडशाक्षर श्रीदत्तमंत्र ॐ ऐं क्लां क्लीं क्लूं, ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं सौः दत्तात्रेयाय नमः । पहिल्या मंत्रात ॐ नंतर यं असे बीजाक्षर असून शेवटी स्वाहा असे आहे. आणि दुसऱ्या मंत्रात ॐ नंतर ऐं हे बीजाक्षर असून शेवटी नमः असे म्हटले आहे हे ध्यानात घ्यावे. षडंगन्यास आणि करन्यास करतेवेळी त्याच्या मंत्रानुसार सदर अक्षरांचा फरक करून घ्यावयाचा आहे. या मंत्राचे न्यास प्रकार येणेप्रमाणे आहेत—

अस्य श्री दत्तात्रेय षोडशाक्षर मंत्रस्य सदाशिव ऋषिः गायत्रीछंदः श्रीदत्तात्रेयो देवता द्रां बीजं नमः शक्तिः दत्तात्रेय इति कीलकं श्री दत्तात्रेय प्रसाद सिध्यर्थं सर्वारिष्ट निरसनार्थंच जपानुष्ठाने विनियोगः तत्रादौ षडंगन्यासं करन्यासंच करिष्ये इतिसंकल्प्य द्रां अंगुष्ठाभ्यां नमः हृदयाय नमः द्रीं तर्जनीभ्यां नमः शिरसेस्वाहा द्रूं मध्यमाभ्यां नमः शिखायै वौषट् द्रैं अनामिकाभ्यां नमः कवचाय हुं द्रौं कनिष्ठिकाभ्यां नमः नेत्रत्रयाय वौषट् द्रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः अस्त्राय फट् ॐ यं (किंवा) ॐ ऐं हृदयाय नमः क्लां क्लीं क्लूं शिरसेः स्वाहा ह्रां शिखायै वौषट् ह्रीं हूं कवचाय हुं सौः दत्तात्रेयाय नेत्राभ्यां नमः स्वाहा (किंवा) नमः अस्त्राय फट् इति " याप्रमाणें उभयविध न्यास करून एकाग्रचित्तानें विधियुक्त जप करावा. या जपानें साधकांच्या सर्व कामना पूर्ण होतात व आयुरारोग्य मिळतें.

यानंतर विंशत्यर्णव (वीस अक्षरी) श्रीदत्तमहामंत्र दिला आहे तो असा– " ॐ ऐं क्लां क्लीं क्लूं ह्रां ह्रीं ह्रूं सहदत्तात्रेयाय विष्णवे नमः । " आरंभी स्नान करून शुद्ध व्हावें. तदनंतर नित्यकर्म व आन्हिक करावें, व संकल्प करून शरीरशुध्दयर्थ षडंगन्यास करावें. नंतर जप करावा. 'अस्य श्री विंशत्यक्षर दत्तमंत्रस्य सदाशिवऋषिः गायत्री छन्दः षड्भुजदत्तात्रेयो देवता श्रीदत्तात्रेय कृपा प्रसाद सिध्दयर्थं च सकलारिष्टशांत्यर्थं जपे विनियोगः । ॐ ऐं अंगुष्ठाभ्यां नमः । हृदयाय नमः । क्लां क्लीं तर्जनीभ्याः नमः शिरसे स्वाहा । क्लूं क्लां ह्रां मध्यमाभ्यां नमः शिखायै वौषट् । ह्रां ह्रीं ह्रूं अनामिकाभ्यां नमः कवचाय हुं । कनिष्ठिकाभ्यां नमः नेत्रत्रयाय वौषट् विष्णवे नमः करतलकरपृष्ठाभ्यां नमः अस्त्राय फट् । ॐ ऐं अंगुष्ठाभ्यां नमः हृदयाय नमः । क्लां क्लीं तर्जनीभ्यां नमः शिरसे स्वाहा । क्लूं ह्रां मध्यमाभ्यां नमः शिखायै वौषट् । ह्रीं ह्रूं अनामिकाभ्यां नमः कवचाय हुं । सहदत्तात्रेयाय कनिष्ठिकाभ्यां नमः । नेत्रत्रयाय वौषट् विष्णवे नमः । करतलकरपृष्ठाभ्यां नमः अस्त्राय फट् याप्रमाणे न्यास व षड्भुजध्यान करून अनुष्ठान करावे.

सच्चिदानन्दस्वरूपी सुखी मुक्तो भवत्यतः ॥
सिद्धगंधर्वादिसङ्गी लक्षजाप्यष्ट सिद्धिभाक् ॥४०॥

त्रिदेवलोकसंचारी कोटिजापी च दत्तवत् ॥
दशकोटिजपी साक्षाज्जरामरणवर्जितः ॥४१॥
ह्यष्टकोटिजपी सिद्धः परकायगतादिकृत् ॥
मन्त्रशक्तिरियं श्लोका अभिगीता इहाप्यमी ॥४२॥
खड्गस्तम्भो जलस्तम्भः सेनास्तम्भस्तथैव च ॥
इच्छासिद्धिर्वशित्वं च दिक्पालैः सह भाषणम् ॥४३॥
वायुवद्गतिरित्याहुराल्हादित्वं च चन्द्रवत् ॥
अग्निवत्सर्वभक्षत्वं नित्यतृप्तत्वमेव च ॥४४॥
सर्वभाषापरिज्ञानं सर्वचित्तावबोधनम् ॥
वापीकूपसमुद्राणां पर्वतानां च चालनम् ॥४५॥
दत्तात्रेयमयः स्वच्छो भवेत्स व्यासवत्कविः
इतीदं षोडशार्णस्य माहात्म्यं तत्प्रयत्नतः ॥४६॥
प्राणो देयो मनश्चक्षुश्छित्त्वा देयं शिरो वपुः ।
न देयः षोडशार्णोऽसौ सच्छिष्याय महात्मने ॥४७॥
महागुणवते देयः कुप्येत प्रभुरन्यथा ॥
मालाकमण्डलू वाद्यत्रिशूले शङ्खचक्रके ॥४८॥

अर्थ :– हा जप करणारा साधक सच्चिदानंद स्वरूप होतो, सुखी होतो, मुक्त होतो. त्यास सिद्धगंधर्वादिकांची संगति लाभते. एक लक्ष जप करण्यानें अष्टसिद्धि प्राप्त होतात. कोटिजप केल्यानें तिन्ही लोकांत संचार करता येतो. दशकोटी जप करण्यानें जरा व मरण यापासून सुटका होते. सोळाकोटी जपानें सिद्धयोगी होऊन परकाया प्रवेश करता येतो. अशाप्रकारचें मंत्रसामर्थ्य आहे. खड्गस्तम्भ, जलस्तम्भ, सेनास्तम्भ, इच्छासिद्धि, वशित्व आणि अष्ट-दिक्पालांबरोबर भाषण या गोष्टी साध्य होतात. वायुप्रमाणें सर्वत्र संचार करता येतो. चन्द्राप्रमाणे आल्हादकता प्राप्त होते; अग्निवत् सर्वभक्षत्व व नित्यतृप्तता प्राप्त होतात. सर्व भाषांचे ज्ञान होतें. सर्व प्राण्यांच्या चित्तांचे ज्ञान होतें,

तसेंच वापी, कूप, समुद्र व पर्वत यांना हलविण्याचें, स्थलांतर करण्याचें सामर्थ्य मिळतें. साधक दत्तात्रेयमय स्वच्छ होतो. व्यासांप्रमाणें कवी होतो असें षोडशाक्षर दत्तमंत्राचें महात्म्य आहे. त्याचें प्रयत्नपूर्वक साधन करावें. प्राण, मन, नेत्र, प्रसंगी मस्तकच नव्हे तर शरीरही अर्पण करावें. परंतु हा षोडशाक्षर मंत्र देऊ नये. तो फक्त सच्छिष्यास, महात्मा व गुणवान् अशासच द्यावा. अन्यथा प्रभूचा कोप होईल. दत्तात्रेयमूर्ति ही त्रिमुखी असून सुप्रसन्न आहे. त्याच्या खालील दोन हातांत अक्षमाला व कमंडलू आहेत. मधल्या दोन हातांत डमरू व त्रिशूल आहेत. आणि वरील दोन हातांत शंखचक्र आहेत. याप्रमाणें ध्यान करून जपानुष्ठान करावें.

दधानमत्रिमरदं दत्तात्रेयं त्र्यधीश्वरम् ॥
ध्यात्वेत्थं विधिवन्मन्त्रजाप्युक्तफलभारभवेत् ॥४९॥
ॐ नमो भगवान्दत्तात्रेयः स्मरणमात्रसंतुष्टो ॥
महाभयनिवारणो महाज्ञानप्रद : ॥५०॥
चिदानन्दात्मा बालोन्मत्तापिशाचवेषो ॥
महायोग्यवधूतोऽनसूयानन्दवर्धनोऽत्रिपुत्रः ॥५१॥
ॐ भवबन्धविमोचनो ह्रीं सर्वविभूतिदः ॥
क्रों असाध्याकर्षण ऐं वाक्प्रदः ॥५२॥
क्लीं जगत्रयवशीकरणः सौः सर्वमनक्षोभणः
श्रीं महासंपत्प्रदो ग्लौं भूमण्डलाधिपत्यप्रद : ॥५३॥
द्रां चिरजीवी वषड्वशीकुरु वौषडाकर्षय ॥
हुं विद्वेषय फडुच्चाटय ठः ठः ॥५४॥
स्तम्भय खें खें मारय नमः संपन्नय ॥
स्वाहा पोषय परमन्त्रपरतन्त्रपरतन्त्राणि ॥५५॥
छिंन्धि ग्रहान्निवारय व्याधीन्विनाशय ॥
दुःखं हर दारिद्र्यं विद्रावय देहं पोषय ॥५६॥

चित्तं तोषय सर्वमन्त्रस्वरूपः ॥
सर्वतन्त्रस्वरूपः सर्वपल्लवस्वरूपः ॥५७॥
ॐ नमो महासिद्धः स्वाहान्तो मालामन्त्रः ॥
प्रथमान्तांश्चतुर्थ्यो द्विः क्रियाश्च न्याहरेत् ॥५८॥

अर्थ : वर वर्णिल्याप्रमाणे ध्यान करून विधिवत् खालील संकल्प करावा. ' अस्य श्रीदत्तात्रेय मालामन्त्रस्य श्रीसदाशिवऋषीः अनुष्टुप् छंदः श्रीदत्तात्रेय षड्भुजदेवता श्रीदत्तात्रेय प्रसादसिद्ध्यर्थं जपे विनियोगः ।' नंतर खालील मालामन्त्राचा जप करावा. " ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय स्मरणमात्रसंतुष्टाय महाभयनिवारणाय महाज्ञानप्रदाय चिदानंदात्मने बालोन्मत्त पिशाचवेषाय महायोगिने अवधूताय अनसूयानंदवर्धनाय अत्रिपुत्राय ॐ भवबन्धविमोचनाय ह्रीं सर्वभूतिदाय क्रों असाध्यकर्षणाय ऐं वाक्प्रदाय क्लीं जगत्रयवशीकरणाय सौः सर्वमनक्षोभणाय श्री महासंपत्प्रदाय ग्लौं भूमण्डलाधिपत्यप्रदाय द्रां चिरजीविने वषट् वशीकुरुकुरु वौषट् आकर्षय आकर्षय हुं विद्वेषय विद्वेषय फट् उच्चाटय उच्चाटय ठः ठः स्तम्भय स्तम्भय खें खें मारय मारय नमः संपन्नय संपन्नय स्वाहा पोषय पोषय परमंत्र परयन्त्र परतंत्राणि छिन्धि छिन्धि ग्रहान्निवारय निवारय व्याधीन्विनाशय विनाशय दुःखं हर हर दारिद्र्यं विद्रावय विद्रावय देहं पोषय पोषय चित्तं तोषय तोषय सर्वमन्त्रस्वरूपाय सर्वतन्त्रस्वरूपाय सर्वपल्लवस्वरूपाय ॐ नमो महासिध्दाय स्वाहा ॥ "

विष्णुनोक्ता इमे मन्त्रा ब्रह्मणे कामधेनवः ॥
प्रयोगग्रहभूतारिकुद्ग्रुक्तापभीतिहाः ॥५९॥
कामिनोऽभीष्टफलदा देवसांनिध्यकारकाः ॥
तद्वच्च वज्रकवचं दत्तनामसहस्रकम् ॥६०॥
एषामन्यतमेनेशं यो वैदिकविधानतः ॥
उपास्ते चित्तशुद्ध्या स मुच्यतेऽत्र परत्र वा ॥६१॥
दत्तात्रेयनिवासं तदाचण्डालश्वगोखरम् ॥
ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तं समदृक् प्रणमेत्सुधीः ॥६२॥

चालको भासकोऽस्त्येषां सच्चिदात्मा स्वयंप्रभः ॥
अस्तिभातिप्रियत्वेन भगवानेव नापरः ॥६३॥
यथाधिपे वशा भृत्या निर्माना ईश्वरे तथा ॥
विद्ध्यात्स्वात्मनो दास्यं निरीहं द्वैतदर्शने ॥६४॥
सख्योः सख्यं यथा लोके निरपेक्षं तथाऽऽत्मनः ॥
परात्मनापि सततं समाधेः प्राक् प्रकल्पयेत् ॥६५॥
कर्तृत्वादि न मय्येके शुद्धे देहादिसाक्षिणि ॥
इतीक्षणमसंदिग्धं सर्वस्वात्मनिवेदनम् ॥६६॥
अतीत्यवरदेशादीन् काश्यां संतोष्य दीपकः ॥
वेदधर्मगुरुं रुग्णं कष्टेन हि महामतिः ॥६७॥
श्रीदत्तलीला श्रवणं ययाचे तुष्ट एव सः ॥
गुरुः शिष्याय यत्प्राह मुक्त्यै तत्सार उच्यते ॥६८॥

अर्थ : श्रीविष्णूनें ब्रह्मदेवाला सांगितलेले हे मंत्र केवळ कामधेनुस्वरूप आहेत. इतरांनीं मंत्रद्वारा केलेले प्रयोग, ग्रहपीडा, भूतपीडा, शत्रुपीडा, वाईट दृष्टिपासूनची पीडा, रोगपीडा, त्रिविध ताप, विविध प्रकारचें भय, या सर्वांचा नाश ह्या मंत्रजपानें होतो. तसेंच अभीष्टफल मिळतें व देवसांनिध्यही प्राप्त होतें. श्रीदत्तवज्रकवच व श्रीदत्तसहस्रनाम यामुळेंही वरील फलप्राप्ति होतें. वरील तिन्हीपैकीं कोणत्याहि एकाचें वैदिक पद्धतीनें अनुष्ठान केल्यास, शुध्द चित्तानें उपासना केल्यास मुक्ति मिळते. सुबुध्दी असणाऱ्या, समदृष्टि असणाऱ्या साधकानें, चण्डाल, श्वान, धेनु, गर्दभ या सर्वांत समभावाने असणाऱ्या ब्रह्मादिस्तम्बपर्यंत चराचर व्यापून उरणाऱ्या श्रीदत्तात्रेय प्रभुना नमन करीत जावे. तोच प्रभू त्या सर्वांचा चालक व मालक आहे. तोच सच्चिदात्मा स्वयंप्रभ असून “ अस्ति” “ भाति ” व “ प्रियत्व ” यांनी प्राणिमात्रांत व्यापून राहिला आहे. त्याशिवाय अन्य कांही नाही. दासदासी, नोकरचाकर, हे जसे सर्व राजाच्या आज्ञेत सदैव रहातात. तसेंच प्राणीमात्रांनी ईश्वरदास्यांत रहावे. त्यावर पूर्ण निर्भर रहावें, निरिच्छ असावें. यासच दास्यभक्ति म्हणतात. लोकव्यवहारा-

मध्ये जसें दोन मित्रांचे एकमेकांवर निस्सीम व निरपेक्ष प्रेम असते तसेंच आपण आत्म्यानें परमेश्वरावर सतत प्रेम करीत असावे. हिलाच सख्यभक्ती म्हणतात. समाधिस्थिती प्राप्त होईपर्यंत साधकाने असें प्रेम करावें. कर्तृत्व भोक्तृत्वादी माझ्या ठिकाणी नाहीत, मी एक आहे, शुद्ध आहे, देहादिकांचा साक्षी आहे, असें असंदिग्धपणे पहाणे यांस सर्वस्वात्मनिवेदन म्हणतात. दृढभक्ति असणाऱ्या, महामति दीपक शिष्यानें काशीक्षेत्रांत वेदधर्मगुरुंचीं रुग्णपणांत खूप कष्ट सोसून सेवा केली. त्या सेवेमुळें संतुष्ट होऊन शिव, विष्णू हे दीपकास वर देण्यास आविर्भूत झाले, परंतु त्यांना नम्रपणें नकार देऊन त्यानें परत पाठविले. गुरूंना पूर्ण संतुष्ट केल्यावर त्यानें श्रीदत्तलीला श्रवण करविण्याची गुरूंना विनंति केली. त्या विनंतीला मान देऊन गुरूंनी जे कथन केलें त्याचेच सार आतां मुमुक्षूंच्या मुक्तिसाठीं येथें कथन करीत आहोत.

॥ इति श्रीदत्त पुराणे उपासना विधि निरूपणं नाम तृतीयाष्टके प्रथमोऽध्यायः ॥

अथ श्रीदत्तात्रेयावतारकर्मादिकथनं नाम तृतीयाष्टके द्वितीयोऽध्यायः ॥

हरिः ॐ ॥ इच्छन्ति यत्कृपां सर्वे तल्लीलात्रोपवर्ण्यते ॥
भार्गवोऽभूद्द्विजः कश्चित्तत्पुत्रो जडवत्सुधीः ॥१॥
तत्पिताह सुताधीष्व वेदान्मुक्त्यै चराश्रमान् ॥
सा प्राह प्राक् तताधीताः सर्वा विद्याः क्रियाः कृताः ॥२॥
भोगा भुक्ता लक्षयोनिराड्भृत्यत्वादि चोषितम् ॥
तत्सर्वं संस्मरे योगभ्रष्टत्वात्पौर्वदेहिकम् ॥३॥
न स्पृश्यामि त्रयीधर्मं भान्ति मे विगुणाः क्रियाः ॥
जातबोधस्य मे वेदैः किं कार्यं वशिनो यतेः ॥४॥
पुराऽऽसं ब्राह्मणो ब्रह्मविचारपरिनिष्ठितः ॥
सत्संगाभ्यासवैराग्यैरेकान्तित्वमुपागतः ॥५॥

देवान्मृतस्य बोधात्प्राग्लुप्ताभ्यासान्न मे स्मृतिः ॥
बुध्द्वेह सुप्तोत्थितवत्स्वात्मानं हि दृढव्रतः ॥६॥

अर्थ : हरिः ॐ। ज्या दत्तप्रभूंच्या कृपेची सर्वजण इच्छा करतात त्यांची लीला येथें वर्णन केली आहे. भार्गव या नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याचा मुलगा बुद्धिमान् असूनही जडवत् वागत असे. एकदा त्याचा पिता त्यास म्हणाला, "अरे, वेदांचें अध्ययन कर, आणि ब्रह्मचर्यादि चारी आश्रमांचे यथायोग्य पालन कर". त्यावर मुलगा म्हणाला, "हे तात ! मी पूर्वजन्मांत सर्व विद्यांचे अध्ययन केलें आहे, तसेंच सर्व क्रियांचे आचरणही केलें आहे. सर्व भोगही भोगलें आहेत व लक्षयोनींत फिरून, राजा, सेवक या सर्व अवस्था भोगल्या आहेत. मी योगभ्रष्ट असल्याने या सर्व बाबतीत माझी स्मृति लोप पावलेली नाहीं. मी त्रयी धर्मांना स्पर्श करीत नाहीं. सर्व क्रिया मला निष्फळ वाटतात. सर्वज्ञान झालेल्या संयमी व संन्यासी अशा मला वेदांशी काय करावयाचे आहे ? पूर्वजन्मीं मी ब्रह्मविचारपरिनिष्ठित असा ब्राह्मण होतो. सत्संगाभ्यास व वैराग्य यांच्या योगें मी एकान्तवास करीत असे. दैवयोगानें आत्मबोध होण्यापूर्वी मी मृत्यु पावलो, आणि अभ्यासाचा लोप झाल्यानें स्मृति राहिली नाहीं. परंतु आतां झोपी गेलेला पुन्हा जागा होताच त्यास जसें सर्व आठवतें तसें मला दृढनिश्चयामुळें स्वात्म्याचें ज्ञान झालें.

प्राप्तोस्मीह परां शान्तिमचलो ह्यब्धिवत्स्वदृक् ॥
नाशो नाद्य त्रिभूमिस्थयमिनः किमुतान्यतः ॥७॥
तच्छ्रुत्वा तं पिता प्राह क्षणसत्संगनिर्वृतः ॥
पुत्रेदृशोऽसि चेत्वादृग् यथा भूयां तथादिश ॥८॥
बिभेमि कर्मनिगडानेक्षेऽत्रान्यत्र वा सुखम् ॥
पुत्रः प्राहार्जुनादिभ्यः श्रीदत्तेन पुरोदितः ॥९॥
योगस्तं दुःखसंयोगवियोगं श्रुणु तात मत् ॥
प्रतिष्ठाने कौशिकाख्यो द्विजः पूर्वार्जितादभूत् ॥१०॥

कुष्ठी रुग्णोऽपि तद्भार्याऽभजत्तं देववत्सदा ॥
स्नानवस्त्राङ्गसंवाहप्रियवाग्भोजनौषधैः ॥११॥
श्लेष्ममूत्रपुरीषासृक्क्षालनैः साधुलेपनैः ॥
स तथा सेव्यमानोऽपि सत्यातीव विनीतया ॥१२॥

अर्थ : मी परम शांतीला म्हणजे श्रेष्ठ मुक्तीला पोंचलो आहे. आत्मस्वरूपीं दृष्टि ठेऊन सागराप्रमाणें शांत होऊन राहिलो आहे. शुभेच्छा, विचारणा आणि तनुमानसा या तीन भूमिवर असणाऱ्या साधकाचा जर नाश होत नाही, तर चतुर्थ भूमीवर असलेल्या माझा नाश कसा बरें होईल ?" या प्रमाणें आपल्या पुत्राचें भाषण ऐकून, क्षणभर सत्संगाचा लाभ मिळाल्यानें वैराग्यशील बनलेला त्याचा पिता म्हणाला, "तूं जर असा श्रेष्ठ आहेस, तर मीही तुझ्यासारखा कसा होईन त्या मार्गाचा मला उपदेश कर. ह्या कर्मरूपी बंधनाचे मला फार भय वाटत आहे, त्यामुळे इह व पर, कोठेच मला सुख दिसत नाहीं." हें पित्याचें वचन ऐकून मुलगा म्हणाला, "श्रीदत्तात्रेयानें अर्जुनादिकांना जो योग कथन केला, व ज्यामुळें दुःख, बंधनांचा वियोग आपोआप होतो, तो मजकडून श्रवण करावा. पूर्वार्जित कर्मानुसार कौशिक नांवाचा एक ब्राह्मण प्रतिष्ठान (पैठण) नगरांत रहात होता. तो कुष्ठी व रोगी होता, तथापि त्याची पतिव्रता पत्नी त्याला देवाप्रमाणें भजत असे. स्नान, वस्त्रपरिधान, अंगसंवाहन, मृदु भाषण, भोजन व औषध देणें, कफ, मल मूत्र, पू, रक्त यांचे क्षालन, औषधलेपन अशा अनेक प्रकारांनीं ती सति त्याची नम्रपणें सेवा करीत होती.

निर्भर्त्सयति तां चण्डः क्रूरो वेश्यागतान्तरः ॥
बीभत्समपि तं देवं मेने सा पतिदेवता ॥१३॥
पराधीनोऽप्येकदा स वेश्यां दृष्ट्वाऽवदत्प्रियाम् ॥
धर्मज्ञे मे हरत्येषा चित्तं तन्वि घटस्तनी ॥१४॥
तद्धाम नय माऽशक्तं मरिष्ये सुभगे न चेत् ॥
कामो वामो न मोक्तुं तं कोऽपि शक्नोति भामिनि ॥१५॥

तच्छ्रुत्वा साभवद्धृष्टा कुलीना सुभगा सती ॥
बद्ध्वा परिकरं शुल्कं भूर्यादाय निधाय तम् ॥१६॥
स्कन्धे मन्दं ययौ रात्रौ ध्वान्ते विद्युत्त्विषा सुधीः ॥
शूले चोरभ्रमात्प्रोतो माण्डव्यो भूभृता विधेः ॥१७॥
ध्वान्तेऽज्ञानात्कौशिकाङ्घ्रिचालितः प्राह दुःखितः ॥
येनाहं दुःखितो यातु मृत्युं सोऽर्कोदयादिति ॥१८॥

अर्थ : परंतु नेहमीं वेश्येचेच चिंतन करणारा तिचा पति तिची निर्भर्त्सनाच करीत असे. तरीही बीभत्स अशा त्याला ती सति देवच मानून सेवा करी. तो पराधीन असूनही, एकदां एका सुंदर वेश्येला पाहून स्वपत्नीला म्हणाला, "हे धर्मज्ञे स्त्रिये, ह्या वेश्येचे स्तन घटासारखे पुष्ट आहेत; हिनें माझे चित्त हरण केलें आहे, तरी अशक्त अशा मला हिच्या घरीं घेऊन चल. हे स्त्रिये, तसें न घडेल तर मी मरेन. कामवासना ही अतिशय विपरीत आहे. तिला कोणीही सोडूं शकत नाहीं (ब्रह्मदेवसुद्धां कामवासनेनें स्वकन्येशी रममाण झाला होता.)" ते भाषण ऐकून ती सती धीट झाली व कंबर बांधून, वेश्येला संतुष्ट करण्यासाठीं धन बरोबर घेऊन, पतीला खांद्यावर घेऊन विजेच्या प्रकाशांत कसा तरी अंधारातून मार्ग काढीत निघाली. दैववशात चोर समजून माण्डव्यऋषीस राजानें सुळावर चढविलेले होतें. मार्गानें जात असतां कौशिक ब्राह्मणाच्या मांडीचा धक्का माण्डव्य ऋषींना लागताच दुःखित होऊन ऋषींनी शाप दिला कीं, " ज्यानें मला दुःख दिलें आहे तो सूर्योदय होताच मृत्यु पावो."

तच्छ्रुत्वोचे सती खिन्ना नोदेष्यत्यर्क इत्यहो ॥
शप्त्वैवं पूरयित्वा स्वभर्तृकामं गृहं ययौ ॥१९॥
तच्छापान्नोदितः सूर्यस्ततस्त्रस्तं जगत्त्रयम् ॥
कालव्यवस्था नष्टेऽर्के नातो लुप्ताः क्रियाः समाः ॥२०॥
इह भीतं जगद्ध्वान्तात्स्वर्गे देवा उपोषितः ॥
वृष्ट्यादिनानुगृह्णीमो मर्त्यांस्तेऽप्यध्वरैश्च नः ॥२१॥

भुक्त्वापि लोलुपा येऽस्मद्दत्तं यागैर्यजन्ति नो ॥
इज्यन्त उपसर्गैस्तेऽतिवृष्ट्याद्यैः सुदारुणैः ॥२२॥
नापराधोऽधुनात्रैषां कालाभावान्नृणामिति ॥
विचार्य शरणं देवाः कं गत्वा तन्न्यवेदयन् ॥२३॥
ध्यात्वा मुहूर्तं ब्रह्मापि देवांस्तान्प्राह सर्ववित् ॥
सूर्यो भीतः सतीशापादुपायः कल्प्यतेऽत्र तु ॥२४॥

अर्थ : माण्डव्य ऋषींनी दिलेला तो शाप ऐकून ती सती खिन्न झाली, आणि "हे सूर्या, तूं उदय पावूं नकोस," असा शाप देऊन, स्वतःच्या पतीची वेश्योपभोगेच्छा पुरी करवून परत स्वगृही गेली. शापामुळें सूर्योदय झाला नाहीं, तेव्हां तिन्ही लोक त्रस्त झाले. सूर्याच्या अभावी कालव्यवस्था नाहीशी झाली, त्यामुळें सर्व वैदिक व लौकिक कर्मे थांबली. जगत् भीतिग्रस्त झालें. स्वर्गांत देव उपवासी राहिले. ते म्हणाले, वृष्टि वगैरे करून आम्ही मानवांना अन्न देतो, आणि मानव आम्हास यज्ञयागादि रूपानें हविर्भाग देतात. जेऊनखाऊन सुद्धां जर हे मानव आम्हास हविर्भाग देत नाहीत, तर अतिवृष्टि, अनावृष्टि अशा दारुण संकटांनी आम्ही त्यांना पीडा करूं. परंतु या वेळीं त्यांचा कांहीच दोष नाही. कारण कालाचाच अभाव झाला आहे. असा विचार करून देव ब्रह्मदेवाकडे गेले व सर्व परिस्थिती निवेदन केली. ब्रह्मदेवानें क्षणभर ध्यानमग्न अवस्थेत जाऊन वस्तुस्थिति जाणून घेतली व सर्वज्ञ असा तो देवांना म्हणाला, " सूर्य सतीच्या शापानें भ्याला आहे. तेव्हा यावर मी उपाय करतो.

तेजसैति शमं तेजो यथा सत्या सती तथा ॥
पतिव्रताग्रण्यात्रेरनसूया तपस्विनी ॥२५॥
वधूः प्रसादिता सैव कार्यं वः साधयिष्यति ॥
इत्युक्तास्ते ययौ साकं धात्राऽत्रेरुटजं शुभम् ॥२६॥
आसाद्यात्रिं च तत्पत्नीं साध्वीं सर्वे च सत्कृताः ॥
प्रापुः कौशिकधामाहानसूया सत्कृता सतीम् ॥२७॥

देवेभ्योऽप्यधिकस्ते किं स्वभर्ता तन्मुखेक्षणात् ॥
नन्दस्यपि तदर्थं ते कच्चिद्‌धृद्धाकृतनुक्रिया ॥२८॥
पतिशुश्रूषयानृण्यं त्रिवर्गाप्तिश्च: योषितः ॥
क्लेशेन महता साध्वी स्वाचारात्पतिलोकगा ॥२९॥
स्त्रीणां पृथक्क्रिया कापि नैवातः सेऽयेशितुः ॥
पुण्यार्धहारिणी सार्धं भर्त्रा पत्यादिलोकगा ॥३०॥

अर्थ : ज्याप्रमाणें तेजाचा तेजानें उपशम होतो, त्याप्रमाणें महासतीच्या सामर्थ्यानेच कौशिक पत्नीला शांत करतां येईल. अत्रिऋषींची पत्नी अनसूया ही पतिव्रताश्रेष्ठ व तपस्विनी आहे. तिला तुम्ही प्रसन्न करून घ्या, तीच तुमचे कार्य साधून देईल." ब्रह्मदेवाच्या या भाषणाशी सहमत होऊन ते ब्रह्मदेवासह अत्रिऋषींच्या पवित्र आश्रमांत गेले. तेथें पोहोंचल्यावर अत्रि अनसूयांचा सत्कार स्वीकारून, देवांनी स्वतः येण्याचें कारण सांगितलें. नंतर अनसूयेसह सर्वजण कौशिकगृही आले. तेथें कौशिक पत्नीनें अनसूयेचा यथायोग्य सत्कार केला. त्यावर अनसूया तिला म्हणाली, "तुझा पती देवांपेक्षाही श्रेष्ठ आहे काय ? त्याचे मुख अवलोकन करून तुला फार आनंद होतो काय ? पतिकरतांच तुझें तन, वाणि आहेत ना ? स्त्रियांना पतिशुश्रूषेनेच धर्मार्थ काम यांची प्राप्ति होते, आणि त्या ऋणांतून मुक्त होतात. महान क्लेश सोसून पतिव्रता स्त्रिया आपल्या आचरणाचे योगें पतिलोकास जातात. पतिव्रता, पतिसेवापरायण अशा स्त्रियांना वेगळे असे धर्म, क्रिया सांगितलेल्या नाहींत. त्या पतिच्या अर्ध्या पुण्याच्या सहभागी होतात (अर्धे पुण्य मिळवितात) व पत्यादिलोकांस जातात.

अतस्त्वया सदा कार्या पातिव्रत्ये मतिः सति ॥
ऐहिकामुष्मिकार्थोऽतः स्त्रीणां भर्ता हि सद्गतिः ॥३१॥
पातिव्रत्यान्मयाप्यार्ये प्राप्तं धर्म्यं महाफलम् ॥
रूपाद्यैः क्वापि नेक्षेऽन्यं भर्तृतुल्यं कदाप्ययि ॥३२॥

इति श्रुत्वाब्रवीत्सापि हृष्टा साध्वि तथैव मे ॥
श्रध्दां वर्धयसेऽत्यन्तं साध्व्या भर्तैव दैवतम् ॥३३॥
दिक्षिद्भिः समं जातं भवत्या दर्शनं परम् ॥
तत्पुण्यात्तेऽनुग्रहोयं धन्याहं वः करोमि किम् ॥३४॥
सा प्राह साध्व्यमी देवा याचन्ते लोकशर्मणे ॥
पूर्ववद्युनिशासंस्थां तदर्थं चागतास्म्यहम् ॥३५॥
लोकोच्छेदः क्रियोच्छेदे ततो नश्येज्जगत्क्रमात् ॥
तत्त्वं प्रसीद धैर्येण सूर्यमावह मानदे ॥३६॥

अर्थ : म्हणून हे सति, तूं नेहमी पातिव्रत्याकडे लक्ष दे. त्यामुळे ऐहिक व आयुष्मिक दोन्ही अर्थ प्राप्त होतात. पति हीच स्त्रियांची सद्‌गति आहे. हे आर्ये, मी सुद्धां धर्म्य असें महाफल पातिव्रत्यामुळें प्राप्त करून घेतले आहे. रुपादिकांनी युक्त अशा अन्य पुरुषास मी कधीही पतितुल्य मानत नाही," याप्रमाणे अनसूयेचे वचन ऐकून कौशिकपत्नी हृष्ट होऊन म्हणाली, "हे साध्वि, माझेंही तसेंच आहे. तूं माझी श्रद्धा वाढवीतच आहेस. साध्वीस पति हेंच दैवत आहे. सर्व देवांसह तुझे पुण्यदर्शन मला घडलें आहे. पति सेवारूपी धर्माचरणानेंच माझेवर ही कृपा झाली आहे. मी तुम्हा सर्वांचे काय करुं ते सांगावे" त्यावर अनसूया म्हणाली, "हे साध्वी जगताच्या कल्याणासाठीं हे देव पूर्ववत् दिवस व रात्र व्हावेत अशी याचना करीत आहेत. त्यासाठीच मी आले आहे. सूर्योदय नसल्यानें लोकोच्छेद व क्रियोच्छेद होऊन क्रमानें जगताचा नाश होईल. तेव्हां तूं कृपा कर व धैर्य धरुन हे मान्यवर स्त्रिये, सूर्यास आवाहन कर." .

सोवाचार्कोदयादेव चण्डमाण्डव्यशापतः ॥
नाशं प्राप्स्यति मे भर्ता सुभगे किं ब्रवीम्यतः ॥३७॥
अनसूयाऽह मा भीस्त्वं सूर्यमावह ते पतिम् ॥
सजीवं पूर्ववत्कुर्वे सत्यं ते यदि रोचते ॥३८॥

तथेत्युक्त्वाऽथ सा साध्वी तद्विश्वासादिवाकरम् ॥
आजुहाव द्रुतं चासौ शोचिष्केशस्तदोदितः ॥३९॥
स्थितोपि षट्शतघटीकालं भीत्योद्गतो रविः
सत्याहूत्या कौशिकासून् सहैव च हरंस्तमः ॥४०॥
स्वेशं दृष्ट्वाब्जिनी हृष्टा क्लिष्टा नष्टाधिपा च सा ॥
अनसूयोवाच भद्रे मा शोचीः पश्य मे तपः ॥४१॥
यदि मेऽनन्यया भक्त्या पत्युपास्तिर्दृढा कृता ॥
स्वप्नेऽपि न मतं पत्या समं कमपि सर्वतः ॥४२॥

अर्थ : अनसूयेचे भाषण ऐकून कौशिकपत्नी म्हणाली, "कोपिष्ट अशा माण्डव्य ऋषीच्या शापानें सूर्योदय होतां क्षणीच माझा पती नाश पावेल. तेव्हां मी काय बोलूं ?" हें ऐकून सती अनसूया म्हणाली, "तूं भिऊं नकोस. सूर्यास आवाहन कर. जर माझें बोलणें सत्य वाटत असेल तर सांगते कीं तुझ्या पतीस मी पूर्ववत् जीवंत करीन." त्यावर कौशिकपत्नी 'ठीक आहे' असें म्हणाली व अनसूयेवर विश्वास ठेऊन सूर्यास आवाहन केलें. तात्काळ सूर्य उदय पावला. सतीच्या शापामुळें ६०० घटीकाल म्हणजे दहा दिवस सूर्योदय न झाल्याने सर्वत्र अंधार झाला होता. सतीच्या हाकेबरोबर सूर्योदय झाला, आणि त्यानें अंधार व कौशिकाचे प्राण या दोहोंचेही हरण केले. सूर्याला पाहून कमलिनी प्रफुल्लित झाल्या, आणि त्याच वेळीं स्वपतीचे प्राण गेल्यामुळें कौशिक पत्नी खिन्न झाली. तेव्हां अनसूया म्हणाली, "हे साध्वी स्त्रिये, दुःख करूं नकोस. माझ्या तपाचा प्रभाव पहा. जर मी माझ्या पतीची उपासना अनन्य भक्तीनें केली असेल, आणि स्वप्नातही पतीच्या तुल्य इतर कोणासही समजले असेल,

हृद्वाक्कायैः स्वधर्माच्चेत्सेविता पतिदेवता ॥
तल्लवात्स्त्रीसहायोऽसौ जीवत्वब्दशतं पुनः ॥४३॥
मन आवर्तयाम्यस्य क्वापि यातं पुनस्त्विह ॥
जीवातवेऽसुनीतेऽस्य तन्मनो धेहि पूर्ववत् ॥४४॥

सत्येत्युक्ते मृतोऽप्येष सुप्तोत्थितवदुत्थितः ॥
स्वदीप्त्या भासयन्वेश्म नीरोगो देववत्सुधीः ॥४५॥
तुष्टाः पुष्पमुचो देवाः ब्रह्मविष्णुशिवादयः ॥
रंभाद्याः ननृतुः साधु गन्धर्वा ललितं जगुः ॥४६॥
देवा ऊचुर्महाकार्यं कृतं कल्याणि नस्त्वया ॥
वरदाः स्मो वरं हृद्यमनसूये वृणीष्व भोः ॥४७॥

अर्थ : हृदय, वाणि आणि शरीर यांच्या योगे स्वधर्मानुसार जर पतिदेवतेचे सेवन मी केलें असेल, तर त्या तपाच्या अंशप्रभावानें ह्या स्त्रीचा स्वामी हा कौशिक ब्राह्मण पुन्हा शंभर वर्षे जगो. या ब्राह्मणाचे अन्यत्र गेलेलें मन (म्हणजे मनःप्रमुख प्राण लिंगदेह) मी पुनः परत आणीन. हे असुनीते, प्राणादिकलानियंत्रि देवते, ह्याचें ते मन पुनः शरीर प्रविष्ट कर." अनसूया सतीचे हें भाषण संपताच मृत असलेला सुद्धां तो कौशिक ब्राह्मण जणूं काय झोपलेला जागा झाल्याप्रमाणें उठून बसला. त्याच्या तेजानें गृह प्रकाशित झालें. तो निरोगी व देवाप्रमाणे बुद्धिवंत झाला. त्यावर ब्रह्मा, विष्णू व शिवप्रमुख सर्व देवांनी आनंदित होऊन पुष्पवृष्टि केली, रंभा वगैरे नाचू लागल्या, गंधर्वांनी सुरेल गाणे सुरु केलें. देव म्हणाले, "हे कल्याणकारिणी अनसूये, तूं आमचें फार मोठें काम केलें आहेस. आम्ही वर देण्यास उत्सुक आहोत, तेव्हां तुझ्या मनांत असेल तो वर मागून घे."

सोवाच भर्तुर्योगोऽस्तु क्लेशमुक्त्यै सदा मम ॥
पुत्रभावं त्र्यधीशो नौ प्राप्नोत्वन्यैर्वरैस्तु किम् ॥४८॥
एवमस्त्विति तां प्रोक्त्वा जग्मुर्देवा यथागतम् ॥
स्वाश्रमं चानसूयापि कौशिकस्त्र्यनुमोदिता ॥४९॥
ततः काले सुचार्वङ्गीमृतुस्नातामनिन्दिताम्
स्वजायां सुदतीं स्वङ्गीं लोभनीयतमाकृतिम् ॥५०॥

ब्रह्मपुत्रो द्वितीयोऽत्रिर्महर्षिर्भगवान्प्रभुः ॥
सकामो मनसा भेजे ध्याताऽजातत्र्यधीश्वरः ॥५१॥
वायूत्थं रज उद्रिक्तं तेजो वैकारिकं द्युमत् ॥
ब्रह्माधिष्ठितमाधत्त चन्द्रः कांशो यतोऽभवत् ॥५२॥
सत्त्वोद्रिक्तं च साभिन्नं त्र्यधीशाधिष्ठितं महः ॥
यतोऽभूद्ब्राह्मणश्रेष्ठः श्रीदत्तौ भगवान्स्वयम् ॥५३॥
तथैव तम उद्रिक्तं रुद्राधिष्ठितमंशतः ॥
वरप्रभावादधृत्वैवं शुशुभे नितरां सतिः ॥५४॥

अर्थ : त्यावर अनसूया म्हणाली, " अविद्यादिकांपासून मुक्ति मिळविण्यासाठीं ऐहिक व अमुष्मिक अर्थ जो धारण करतो त्या माझ्या पतीचे मी निरन्तर ब्रह्मभावानें ध्यान करावें आणि दुसरा वर असा मिळावा कीं गुणत्रयनियन्ता परमेश्वर तो आमचे पुत्रत्व स्वीकारो. याहून अन्य वरांचा काय उपयोग ? " यावर " तथास्तु " असे तिला म्हणून देव आपापल्या निवासस्थानाकडे निघून गेले. कौशिकस्त्रीचा निरोप घेऊन अनसूयाहि आपल्या आश्रमाकडे गेली. नंतर योग्य काळीं सुंदर, ऋतुस्नात, अनिन्दित, सुदती, रेखीव व लोभनीय आकृति असलेल्या आपल्या स्त्रीकडे (अनसूयेला) द्वितीय ब्रह्मपुत्र, अजन्मा परमेश्वराचें सतत ध्यान करणारा, महर्षि भगवान् प्रभु अत्रि यानें, परमेश्वर आपला पुत्र होवो या इच्छेनें, वायुनें उत्थान पावलेलें तेजस्वी शुक्र मनःप्रभावानें पाठविलें. तें तेज ब्रह्माधिष्ठित असल्यानें त्यापासून चंद्र उत्पन्न झाला. तसेंच परमेश्वरानें अधिष्ठित केलेलें महान् असें ब्रह्मविद्वरिष्ठाचे सत्वगुणप्रधान तेज आधान झाल्यामुळें ब्राह्मणश्रेष्ठ श्रीदत्तात्रेय स्वतः अवतीर्ण झाले, आणि रुद्राधिष्ठित तमगुणप्रधान तेजामुळें दुर्वास मुनींचा जन्म झाला. देववरप्रभावानें गर्भधारणा झाल्यावर सती अनसूया अत्यंत शोभू लागली.

यथाकालं कृताः सर्वे संस्कारा अत्रिणा क्रमात् ॥
ततस्त्र्यधीशोऽवतस्तद्गर्भत्रयरूपतः ॥५५॥

दत्तावतारकाले तु सुयोगे मुदितं जगत् ॥
त्रीशत्वं दर्शयित्वा प्राक् स्मृत्यै बालोऽभवस्तुतः ॥५६॥
चक्रेऽथ जातकर्मात्रिर्विधिना नामकर्म च ॥
चन्द्रो दत्तश्च दुर्वासाः सतीस्तन्यं पपुर्मुदा ॥५७॥
चन्द्रोऽगात्संस्कृतः स्वर्गमोषधीशोऽन्वयर्द्धिकृत् ॥
दुर्वासाश्चोद्धतोऽटद्भ्यां स्वैरं रौद्रोऽसदर्दनः ॥५८॥
आप्तकामोऽपि भगवान्श्रीदत्तो योगमायया ॥
बालानुसार्थक्रियोऽपि बालोक्तैर्मुग्धचेष्टितैः ॥५९॥
क्वाप्यतर्क्यसुलीलाभिः क्वापि धाष्ट्यैश्च चंक्रमैः ॥
दर्शयन्भक्तवशतां संतोष्य पितरौ स्थितः ॥६०॥

अर्थ : अत्रिऋषींनीं यथाकाल पुंसवनादि सर्व संस्कार केले. नंतर गुणत्रयनियन्ता परमेश्वर तीन वेगवेगळ्या गर्भांचे रुपानें अवतीर्ण झाला. दत्तावताराच्या वेळी (त्या सुमंगल वेळेला) सर्व जग आनंदित झालें. पूर्वी दिलेल्या वराचें स्मरण करून देण्यासाठीं त्रीशत्व दाखविले व बाल व्हावें अशी मातापित्यांनी विनंती केल्यावर बालरुप धारण केलें. नंतर अत्रिमुनींनी विधिनियमानुसार जातकर्मादि संस्कार करून चंद्र, दत्त व दुर्वास असें तिघांचे नामकरण केलें. तिघांनी सती अनसूयेचें स्तन्य आनंदानें प्राशन केलें. सुसंस्कृत असा चंद्र स्वर्गांत गेला व औषधिंचा स्वामी होऊन, वंशवृद्धि करीत राहिला. उद्धत असा दुर्वास स्वच्छंदपणें विहार करून दुर्जनांना शासन करूं लागला. सर्व इच्छा तृप्त झालेला असा श्रीदत्तात्रेय भगवान योग-मायेच्या योगानें बालभाव धारण करून, सुंदर क्रीडा करून, कधीं अतर्क्य खेळ करून दाखवीत, तर कधी धाडसी खेळ करून दाखवीत, भक्तपराधीनता दाखवित व मातापित्यांना संतोष देत आश्रमांत राहिले.

शिष्टपो दुष्टहा मान्यो योगमार्गप्रवर्तकः ॥
इतिश्रुत्वा मुनिगणा योगाभ्यासार्थमाययुः ॥६१॥

जलेऽगाधेऽविशत्तांस्तु सर्वज्ञोपि परीक्षितुम् ॥
शताद्वं तत्र केऽप्यस्थुस्तन्मोहायापि योगिराट् ॥६२॥
स्वाश्रयां परशक्तिं स धृत्वा मूर्तिमदुद्गतः १ ॥
गायन्तीं साधु वाद्यानि वादयन्तीं निजाङ्कगाम् ॥६३॥
पीनश्रोणिकुचां तन्वीमनघां मद्यमांसयुक् ॥
तेजीयसां न दोषोऽयमित्युक्त्वा केचनास्थिताः ॥६४॥
ततो ज्ञात्वाऽमलाच्छिष्टांश्चक्रेऽनुग्रहमुत्तमम् ॥
प्रभुर्येनार्जुनमुखा योगर्द्धिमुभयीं ययुः ॥६५॥
साहसं यद्यपीशस्य स्वैरं धर्मव्यतिक्रमः ॥
ते जीयस्त्वान्न दोषोऽग्नेरिव सर्वभुजो विभोः ॥६६॥
मूढोऽनीशश्चरन्नश्येत्ताद्विनेशं यथा विषम् ॥
धर्माद्यस्पृग्वायुनन्निस्त्रैगुण्यः श्रुतिमूर्धगः ॥६७॥
तादृगीशवचस्तथ्यं तथैवाचरितं क्वचित् ॥
तयोर्धर्म्यं प्रवृत्ताहं युक्तं तन्मतिमांश्चरेत् ॥६८॥

अर्थ : श्रीदत्तात्रेय हा सज्जनांचा पालनकर्ता, दुष्टांचा हर्ता, सर्वमान्य व योगमार्गप्रवर्तक आहे हें ऐकून मुनिगण त्याचेकडे योगाभ्यासासाठीं आले. त्यांची परिक्षा पहाण्यासाठीं श्रीदत्तात्रेयांनी अगाध अशा जलांत बुडी मारली. पाण्यांत बुडी मारून शंभर वर्षे पर्यंत तेथेच वास्तव्य करून राहिलेल्यांनाही मोहित करण्याकरतां त्यांनी पाण्यांत बुडी मारली. स्वाश्रया अशा परशक्तिला आपल्या मांडीवर घेऊन श्रीदत्तात्रेय पुन्हा पाण्यावर आले. ती शक्ती गात असे, वाद्ये वाजवीत असे, तसेच तिचे स्तन व श्रोणी भाग मोठा होता. ती अनघा असूनही तिनें मद्यमांस जवळ घेतलेले होतें. अशा प्रकारचा श्रीदत्तात्रेयांचा अवतार पाहूनही कांहीं मुनि स्वस्थ राहिले, कारण निस्त्रैगुण्यमार्गावर असलेल्या मोठ्या लोकांना हा दोष लागत नाही असा त्यांनी विचार केला. नंतर आपले जे भक्त रागादि विकाररहित आहेत त्यांच्यावर श्री दत्तात्रेयांनी उत्तम कृपा केली, त्यायोगे सहस्रार्जुनादिकांनी

योगप्राप्ति करुन घेऊन ऐहिक व आयुष्मिक कल्याण साधलें. ईश्वराचें साहस हें कधी कधीं धर्मव्यतिक्रमरुप दिसत असलें तरी सर्वभक्षक अग्नीप्रमाणें प्रभूच्या व्यापकत्वामुळे व तेजीयस्त्वामुळें त्यास कांही दोष स्पर्श करू शकत नाहीं. एखादा असमर्थ मूर्ख मनुष्य जर त्याप्रमाणें वागूं लागेल तर त्याचा सर्वनाश होईल. हालाहल वीष प्राशन करण्यास एकटा भगवान् शंकरच समर्थ झाला, इतरांना तें शक्यच नव्हते, त्याप्रमाणें. वेदमार्गातीत व नैस्त्रैगुण्य अशांना धर्माधर्म स्पर्श करुं शकत नाहींत. ते वायुवत् मुक्तच असतात. ईश्वराचें फक्त वचनच अनुसरावें, कृति नाहीं. त्यांतून बुद्धिमान माणसानें कोणते धर्म्य आचरण्यासारखें आहे तेच योग्यायोग्य पाहून आचरावें.

॥ इति श्रीदत्तात्रेयावतार कर्मादिकथनं नाम तृतियाष्टके द्वितीयोऽध्यायः ॥

अथ कार्तवीर्यार्जुनचरितं नाम तृतीयाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

हरि ॐ ॥ इन्द्रतुल्यः पुरा सोमवंश्यः कृतयुगे नृपः ॥
कृतवीर्याभिधः सम्राट् शतपुत्रान्वितोऽभवत् ॥१॥
दैवाच्च्यवनशापत्तत्पुत्रा दग्धा नृपो ययौ ॥
गुरुं शरणमस्मै स प्राहाघहृत्सुखम् ॥२॥
कृतवीर्यानपत्यत्वं स्रावो गर्भस्य मूढता ॥
पातो मृतोद्भवो जातनाशो वैकल्यमस्य वा ॥३॥
भूतग्रहार्तिरोगाद्यैर्बाल्ये वान्यत्र चेच्छिशोः ॥
नाशश्चास्यापि तत्रेयं शान्तिदा सप्तमीनयुक् ॥४॥
ग्रहानुकूले सत्काले व्रतं संकल्प्य वाचयेत् ॥
स्वात्याचार्यं च वृणुयाच्छुद्धभूमौ वृतः स च ॥५॥
प्रतिष्ठाप्याग्निमीशान्यां विधिवत्कलशोपरि ॥
सूर्यरुद्रसप्तमातृप्रतिमा : स्वर्णनिर्मिता : ॥६॥

अर्थ : हरि ॐ । प्राचीन काळीं कृतयुगात सोमवंशोत्पन्न कृतवीर्य नांवाचा सम्राट होता. त्याला शंभर पुत्र होते. परंतु दैवयोगाने च्यवनऋषींच्या

शापामुळे त्याचे सर्व पुत्र जळून मरण पावले. तेव्हां त्याचे गुरु बृहस्पति यांना तो शरण गेला. तेव्हां बृहस्पतींनी त्याला पापनाशक आणि संतानवर्धक असें व्रत सांगितलें. " हें कृतवीर्या, मूल न होणें, गर्भस्राव, मूढता, गर्भपात्, मेलेलें मूल जन्मास येणें, जन्मतांच मृत्यु, किंवा अन्य धोका प्राप्त होणें, तसेंच भूत, ग्रहपीडा, अथवा रोगांमुळें बालवयांत किंवा शिशुवयांत नाश होत असतांना हें शांतिदायक असें रविवारयुक्त सप्तमीचें व्रत आचरावें. ग्रहानुकूल्य असावें, त्या दिवशीं विधीपूर्वक संकल्प करून आचार्यवरण करावें. आचार्यत्व स्वीकारल्यावर आचार्यांनी गोमयशुद्ध भूमिवर स्थंडिलाची स्थापना करावी. नंतर अग्नीची प्रतिष्ठापना करावी. अग्नीच्या ईशान्य कोणांत प्रथम पीठ स्थापना करून, कलश स्थापना करावेंत. कलशांवर पूर्ण पात्रें ठेवावीत. नंतर त्या कलशांवर सोन्याच्या सूर्य, रुद्र आणि सप्तमातृका स्थापाव्यात.

संस्थाप्याभ्यर्च्य शान्त्यर्थं सप्तकुम्भान्यथाविधि ॥
पूर्वपश्चिमकोणान्तदेशस्थाञ्जलपूरितान् ॥७॥
सौरौषध्यृषिमन्त्रैः समृद्रत्नौषधिपल्लवान् ॥
स्तुत्वान्वाधायाधिश्रित्य पायसं जुहुयात्क्रमात ॥८॥
प्रत्येकं पायससमिद्यवकृष्णतिलैर्गुरूः ॥
सूर्यरुद्रमनुभ्यां च शतमष्टोत्तरं विधेः ॥९॥
कुर्यात्स्विष्टकृदाद्यङ्गं बलिं पूर्णाहुतिं तत : ॥
जीवत्पतिप्रजा वृद्धा ब्राह्मण्यः स्वर्चिताः स्थिताः ॥१०॥
उदङ्मुख्योऽभिषिञ्चेयुर्घटाद्भिस्तत्स्थपल्लवैः ॥
दीर्घायुरस्तु बालोऽयं जीवत्पुत्रा च भामिनी ॥११॥
आदित्यचन्द्रयुक्तं यद्ग्रहनक्षत्रमण्डलम् ॥
शक्रः सलोकपालश्च ब्रह्मविष्णुमहेश्वराः ॥१२॥
एते चान्ये च ये देवाः सदा पान्तु कुमारकम् ॥
मा शनिर्मा च हुतभुङ्ग मा च बालग्रहाः क्वचित् ॥१३॥

पीडां कुर्वन्तु बालस्य मा मातुर्जनकस्य च ॥
एवं जातेऽभिषेकेऽथ धृत्वा शुक्लाम्बरादिकम् ॥१४॥
अभिषेकाप्लुतं वस्त्रं दत्वाचार्याय देवताः ॥
संपूज्य स्वर्णगोवस्त्रैः संपूज्याचार्यमृत्विजः ॥१५॥

अर्थ : प्रथम पूर्व, पश्चिम दिशांना, चार कोनांना चार व मध्यें एक असे सात कुंभ स्थापन करून, त्यांचे शान्त्यर्थ यथाविधि अर्चन करावें. " उदुत्यमिति " सौरमंत्र, " या ओषधिरिति " ओषधिमंत्र, " सहस्तोमा " हे ऋषिमंत्र, " देवदानव " हे पौराण मंत्र, यांनी मृत्तिका, पंचरत्नें, ओषधि, वनस्पति, पंचलतापल्लव घालून वरुण स्तुति करावी. नंतर स्थंडिलावर अग्नीचें अन्वाधान करावें. त्या अग्नीवर निर्वाप तांदळाचे पायसान्न शिजवावें, आणि क्रमशः आवाहित देवतांचें हवन करावें. हवनीय द्रव्य पायस, समिधा, कृष्णतीळ, यांनी गुरु, सूर्य, रुद्र या देवतांच्या मंत्रांनीं त्या देवतांप्रीत्यर्थ होम करावा. विधिनुसार एकशेआठ आहुतिसंख्या घ्यावी. नंतर स्विष्टकृत्, इत्यादि अंगहोम करून बलिदान करावें. नंतर पूर्णाहुति द्यावी. नंतर ज्यांचे पति व अपत्यें जीवंत आहेत अशा वृद्ध सुवासिनींची पूजा करावी. वस्त्राभरणें द्यावी. नंतर उत्तरेकडे तोंड करून उभ्या असणाऱ्या त्या स्त्रियांकडून यजमान व त्याच्या पत्नीस अभिषेक करवावा. त्यासाठीं मंत्रपूर्वक स्थापन केलेल्या घटांतील जल व कलशांवरील पञ्चपल्लव घ्यावेत. ज्या मंत्रांचे शेवटी "दीर्घायुः" असे शब्द आहेत असे तीन मंत्र घ्यावेत. त्यानंतर खालील प्रमाणें आशिर्वाद द्यावा. " हा मुलगा दीर्घायु होवो. हे स्त्रिये, तूं जीवत्पुत्रा हो. सूर्यचन्द्रयुक्त ग्रहनक्षत्र मण्डल, इंद्र, सर्व लोकपाल, ब्रह्मा विष्णु व महेश्वर, अन्य देव तुझ्या कुमाराचे रक्षण करोत. शनि, अग्नि, बालग्रह हे तुझ्या कुमारास व त्याच्या मात्यापित्यास पीडा न करोत. " या प्रमाणें आशिर्वाद मंत्रोच्चारपूर्वक अभिषेक झाल्यानंतर दुसरी शुभ्र वस्त्रें धारण करावीत व अभिषेकानें भिजलेली वस्त्रें आचार्यास द्यावीत. नंतर देवतांची, आचार्यांची व ब्राह्मणांची पूजा करावी, त्यांना सुवर्ण, गाई व वस्त्रें द्यावीत.

गुरवे तिलपात्रस्थां कालमूर्तिं च काञ्चनीम् ॥
दत्वा सदक्षिणां विप्राः सस्त्रीकाः पायसादिना ॥१६॥
भोज्यास्तैराशिषो देयाः संतुष्टैर्दक्षिणादिना ॥
दीर्घायुरस्तु बालोऽयं यावद्वर्षशतं सुखम् ॥१७॥
यत्किंचिदस्य दुरितं तत्क्षिप्तं वडवामुखे ॥
ब्रह्माविष्णुर्हरिः स्कन्दो वायुः शक्रो हुताशनः ॥१८॥
रक्षन्तु सर्वदुष्टेभ्यो वरदाः सन्तु सर्वदा ॥
इति लब्ध्वाऽऽशिषो नत्वा तान्कर्ता सकुटुम्बकः ॥१९॥
कर्मेश्वरार्पणं कृत्वा हुतशेषं च भक्षयेत् ॥
एवं कृते व्रते नश्येत्सप्तम्यां दुष्टमप्यरम् ॥२०॥
विधिना कुर्विदं राजन् सम्राट पुत्रो भविष्यति ॥
इत्युक्त्वागाद्गुरू राजा व्यकृणोद्विधिवद् व्रतम् ॥२१॥

अर्थ : नंतर तिलपात्रावर स्थापन केलेली सुवर्णाची रुद्रप्रतिमा दक्षिणेसह गुरूंना दान करावी. सस्त्रीक विप्रांना पायसादिकांचे भोजन घालावें. त्या विप्रांनी दक्षिणादिकांनी संतुष्ट होऊन यजमानास खालील प्रमाणें आशीर्वाद द्यावा—" हा बालक शतायुषी व दीर्घायु होवो. सुखी होवो. जें कांहीं तुमचें पाप असेल तें अग्निमुखांत नष्ट झालें आहे. ब्रह्मा, विष्णु, हरि, स्कंद, वायु, इंद्र, अग्नि हे सर्व दुष्टांपासून तुमचे सर्वदा रक्षण करोत. तुम्हांस वरदान देवोत." याप्रमाणें आशीर्वाद प्राप्त करून, यजमानानें सहकुटुंब त्यांना नमस्कार करावा व केलेलें कर्म ईश्वरार्पण करून शेषनैवेद्य भक्षण करावा. अशा प्रकारचें सप्तमि व्रत केल्यानें अतिशय दुष्ट पापताप व पीडा नाहींशा होतात. तेव्हां हे राजा, तूं हे व्रत विधिवत् कर म्हणजे तुला सम्राट पुत्र प्राप्त होईल." असें बोलून बृहस्पति निघून गेले नंतर राजानें तें व्रत विधिपूर्वक आचरिलें.

अथैकदापि महिषी नाम्ना शीलधरास्य च ॥
मैत्रेयीं गुणवत्पुत्रलब्धयेऽपृच्छदानतां ॥२२॥

मैत्रेय्युवाच श्रीदत्तव्रतं कुर्वीष्टदं त्विदम् ॥
आब्दं मार्गादिपूर्णायां प्रतिमासमनन्तकम् ॥२३॥
संकल्प्य तद्वाचयित्वा समभ्यर्च्य पितृन्पुरा ॥
स्नानं कृत्वा पूर्णिमायां गव्यं प्राश्यार्चयाक्षरम् ॥२४॥
अनन्तः सर्वकामानामनन्तं भगवान्फलम् ॥
ददात्वनन्तः पुत्रं च भद्रं चान्यच्च जन्मनि ॥२५॥
अनन्तपुण्योपचयमनन्तः पूजयार्पितः ॥
महाव्रतप्रभावेन संतुष्टः सकलेश्वरः ॥२६॥
इत्युच्चार्याभ्यर्च्य नाम्ना तद्दिने निशि हव्यभुक् ॥
वामं पादं कटिं वस्त्रं स्कन्धौ दक्षं कटिं पदम् ॥२७॥

अर्थ : एकदां कृतवीर्य राजाची पत्नी शिलधरा हिनें याज्ञवल्क्यपत्नी मैत्रेयी हिला नम्रपणें प्रश्न केला की, " गुणवान पुत्राची प्राप्ति होण्यासाठी कोणते व्रत करावें ? " त्यावर मैत्रेयी म्हणाली, " श्रीदत्तात्रेयांनी सांगितलेले हें इष्टकामप्राप्ति करून देणारें व्रत तूं एक वर्षभर कर. मार्गशीर्ष पौर्णिमेपासून दर पौर्णिमेस हें अनंत व्रत करायचे असतें. व्रताचा संकल्प करून, प्रथम नांदीश्राद्ध करावें. पञ्चगव्य प्राशन करावें. नंतर अक्षर अशा परब्रह्मरूप परमेश्वराची पूजा करावी. नंतर अनन्त सर्व इच्छा सफल करो, भगवन्तानें दिलेले फल अनन्त असो, अनंतपुत्रसंपत्ति देवो, पुढील जन्मांतही कल्याण करो, अनंत पुण्याचा साठा देवो, या व्रतप्रभावानें सकलेश्वर अनंत संतुष्ट होवो, अशी प्रार्थना करावी. त्या त्या महिन्याच्या नांवाने अनंताच्या त्या त्या अवयवाची पूजा करावी. पूजाविधीमध्ये सांगितलेल्या नाममंत्राचा ॐकारपूर्वक " ॐ अनन्ताय नमः " असा उच्चार करुन प्रत्येक मासीं एक एक अवयवाची पूजा करावी. सांग पूजा झाल्यावर रात्री हविष्यान्न भोजन करावें. मार्गशीर्षांत डाव्या पायाची, पौषांत डाव्या कटीची, माघांत वस्त्राची, फाल्गुनांत खांद्यांची, चैत्रांत उजव्या कमरेची, वैशाखांत दक्षिण पायाची पूजा करावी.

कण्ठं जानूरू च गुह्यं हृत्कं मार्गादिमासतः ।।
अनन्त इति कं सर्वात्मेत्यूरू चोरुबाहवः ।।२८।।
संकर्षणेति दिव्यास्त्रधारीति च गलः कटिः ।।
श्रीकण्ठेति च कामेति जानु शेषेति चाननम् ।।२९।।
पूज्यं विश्वमुखेत्यूरू तथा संकर्षणेति च ।।
वासुदेवेति मुसलं रौप्यं हैमं हलं सदा ।।३०।।
पूज्यं पार्श्वे व्रतं त्वेवं कुर्वब्दं हविष्यभुक् ।।
गोमूत्रं प्राक् चतुर्मासं प्राश्यं देया यवास्ततः ।।३१।।
प्राश्यं देयं घृतं गव्यं व्रतसंपूर्तये ततः ।।
उदकुम्भान्द्वादशात्र दद्याद्वा भोजयेद्द्विजान् ।।३२।।
एवं कृते व्रते तुष्येदनन्तः सर्वकामदः ।।
कुरुष्वैतद्व्रतं शीलधरे पापप्रणाशनम् ।।३३।।

अर्थ : ज्येष्ठ मासांत कण्ठाची, आषाढांत गुडघ्याची, श्रावणांत मांड्यांची, भाद्रपदांत गुह्यभागाची, आश्विनांत हृदयाची, आणि कार्तिकांत मुखादिसहित शीर्षाची पूजा करावी. तसेंच नाममंत्रांनीं अंगपूजाही करावी. अनन्त नांवानें शीर्षाची, सर्वात्मने नमः या मंत्रानें उभय चरणांची, संकर्षणाय नमः या मंत्राने उभय मांड्यांचीं, दिव्यास्त्रधारिणे नमः या मंत्राने दोन्ही बाहूंची, श्री कण्ठाय नमः या मंत्रानें कंठाची, कामाय नमः या मंत्रानें कटीची, शेषाय नमः या मंत्रानें दोन्ही गुडघ्यांची, विश्वमुखाय नमः या मंत्रानें मुखाची, पूजा करावी. त्याचप्रमाणें दर महिन्याच्या पूजेचे वेळीं " ॐ संकर्षणाय नमः " या मंत्रानें मुसळाची व "वासुदेवाय नमः" या मंत्रानें नांगराची पूजा करावी. ही दोन आयुधें चांदीची किंवा सोन्याची असावीत. तीं प्रतिमेच्या दोन्ही बाजूस ठेवावीत. याप्रमाणे व्रत एक वर्ष करावें. पहिल्या चार महिन्यांत पूजेपूर्वीं गोमूत्र प्राशन करावें. पुजा झाल्यावर यवांचे दान करावें. रात्रीं हविष्यान्न भोजन करावें. नंतरच्या आठ महिन्यांत प्रथम गाईचें तूप प्यावें, पूजोत्तर घृतदान करावें. व्रतपूर्तिसाठीं बारा उदककुंभ ब्राह्मणास दान करावेत. गोदान द्यावें, द्विजांना

भोजन द्यावें. अशा प्रकारें व्रत केलें असतां सर्वकामद अनन्त संतुष्ट होईल. तरी हे शीलधरे, तूं हें व्रत कर. त्यानें पापनाश होईल. त्या योगानें लोकोत्तर गुणवान्, सम्राट आणि चिरंजीवी पुत्र होईल." असें म्हणून, शीलधरेकडून सत्कार केली गेलेली ब्रह्मवादिनी मैत्रेयी निघून गेली.

योगीशपत्नी राज्ञी तु व्रतं चक्रे यथोक्तवत् ।।
संतुष्टस्तेन भगवान्दत्तात्रेयो दिगम्बरः ।।३५।।
अवधूतं निजं रूपं सहस्त्रार्कप्रभोज्ज्वलम् ।।
मन्दस्मितमुखेनोचे राज्ञि साधु व्रतं कृतम् ।।३६।।
अत्युत्कटव्रतवृषफलं त्वत्रैव जन्मनि ।।
पुत्रस्ते भविता योगी सप्तद्वीपपतिर्विभुः ।।३७।।
अव्याहताज्ञो मत्कल्पः स्मृतिगामी न संशयः ।।
इति स्वप्नं सती दृष्ट्वा बुध्द्वा हृष्टतमावदत् ।।३८।।
कृतवीर्याय पत्ये सा श्रुत्वा सोऽपि तुतोष ह ।।
कृतवीर्योऽथ संतुष्टः काले कालेऽकरोत्क्रियाः ।।३९।।
धृत्या च हृत्समुन्नत्या क्रमात्पुंसवनादिकाः ।।
ततोऽसूत शुभे काले स्वोच्चस्थैः पञ्चभिर्ग्रहैः ।।४०।।
सुपुत्रं ज्ञापिताशेषभाग्योभयसुसंपदम् ।।
जातमात्रे शिशावाशाः प्रसेदुः प्रववौ मरुत् ।।४१।।
शान्ताः प्रदक्षिणशिखा अग्नयो यज्वनोऽभवन् ।।
नीरजस्कमभूद्व्योम हर्षितं सकलं जगत् ।।४२।।

अर्थ : याज्ञवल्क्यपत्नीनें सांगितल्याप्रमाणें शीलधरा राणीने यथासांग व्रत केले. त्या व्रतानें श्रीदत्तात्रेय भगवान् संतुष्ट झालें व आपलें दिगम्बर, अवधूत व सहस्रसूर्यांच्या तेजासमान तेजःपुंज असें स्वरुप स्वप्नांत शीलधरा राणीला दाखवून मंदस्मित करून म्हणाले, " हे राणि, तूं व्रत उत्तमप्रकारें आचरिले आहेस. अतिउत्तम अशा या व्रताचरणाचें फल तुला याच जन्मांत

मिळून तुझा पुत्र योगी, सप्त द्विपांचा स्वामी, प्रसिद्ध, ज्याची आज्ञा अप्रतिहत असेल असा, अणि माझ्याप्रमाणेच स्मरण करताच प्रकट होणारा असा होईल." ह्या प्रकारचे स्वप्न पाहून जागी होताच शीलधरा राणी अतिशय आनंदित होऊन आपला पति कृतवीर्य यास तिनें ते स्वप्न सांगितलें. त्यासहि आनंद झाला. त्याने संतुष्ट होऊन पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें पुंसंवनादिक सर्व कार्ये यथाकाल केली. पुढे योग्य काली पांचही ग्रह उच्चस्थानीं असतांना शुभकाली राणीने सुपुत्रास जन्म दिला. पूर्ण भाग्य व ऐहिक, अमुष्मिक संपत्तीनें युक्त असा हा पुत्र होणार हे ग्रहयोगावरून स्पष्ट दिसत होतें. पुत्र जन्म होतांच दिशा सुप्रसन्न झाल्या, वारा शांतपणें वाहू लागला. अग्निज्वाला शांतपणें प्रदक्षिणाकार फिरूं लागल्या. आकाश मेघरहित व निर्मल होते. सकल जगत् आनंदित झालें होते.

देवदुन्दुभयो नेदुः पुष्पवृष्टिः पंपात् खात् ॥
जगुर्गन्धर्वपतयो ननर्तोप्सरसां गणः ॥४३॥
धर्मे मनोऽभवन्नृणां प्रससाद सतामपि ॥
आयुष्मान्भव सौम्येति सिद्धाद्या अब्रुवंस्तदा ॥४४॥
राजाप्याहूय दैवज्ञाञ्जातकर्माकरोत्तदा ॥
गोभूहिरण्यवस्त्राणि द्विजादिभ्यो ददौ नृपः ॥४५॥
दैवज्ञा अब्रुवन्राजन्कुमारो दैवशाल्ययम् ॥
श्रीदत्तस्य कृपापात्रं भविष्यति तपोबलात् ॥४६॥
अनष्टद्रव्यतास्यैव नामसंकीर्तनान्नृप ॥
सप्तद्विपमहीपालः स्मृतिगामीह दत्तवत् ॥४७॥
पञ्चाशीतिसहस्राब्दं चक्रवर्ती भविष्यति ॥
अनन्तव्रतमाहात्म्यात्सम्राडेष जयी वशी ॥४८॥
सूर्यव्रत प्रभावेन लक्षायू रोगवर्जितः ॥
इत्युक्त्वा गणकास्ते तु पूजिताः खगृहं ययौ ॥४९॥

अर्थ : कृतवीर्याच्या पुत्राच्या जन्मानें आनंदित होऊन देवानीं दुन्दुभिनाद केला. स्वर्गांतून पुष्पवृष्टी झाली. गंधर्वपतींनी गायन केलें व अप्सरागण नाचू लागला. लोकांची धर्मभावना वाढली; व सज्जनांची अंतःकरणें प्रसन्न झालीं. सिद्धादिकांनी त्या पुत्रास दीर्घायुष्य प्राप्तीचा आशीर्वाद दिला. राजानेंही ज्योतिषांना बोलावून मुलाचें जातकर्म केलें व द्विजादिकांना गाई, भूमि, सोनें, वस्त्रें यांचे दान केलें. ज्योतिषि म्हणाले, " हे राजा, हा पुत्र दैवशाली आहे. हा तपोबलानें श्रीदत्तात्रेयांचे कृपापात्र होईल. ह्याच्या नामसंकीर्तनानें नष्टद्रव्याची पुनःप्राप्ति होईल. हा सप्त द्विपांचा स्वामी होईल, व श्रीदत्तात्रेयांप्रमाणें स्मृतिगामी होईल. हा पंचाऐंशी हजार वर्षें चक्रवर्तिपणानें राज्य करील, अनन्त व्रतमहात्म्यानें हा सम्राट्,जयी व वशी होईल. तो सूर्यव्रत प्रभावानें लक्ष वर्षे आयुष्याचा व रोगरहित होईल." असें ज्योतिषांनी सांगितल्यावर राजानें त्यांची पूजा केली. त्यानंतर ते आपल्या घरी गेले.

अथार्जुनं सुतं नाम्ना षोऽशेऽह्नि पिताकरोत् ॥
ततः कालेन कियता तत्पिता पञ्चतामितः ॥५०॥
राज्यं कुर्वर्जुनेत्युक्तः पौरैः प्राहापि संस्कृतः ॥
न करिष्यामि राज्यं स्वकर्मापि नरकोत्तरम् ॥५१॥
भुवः षष्ठांशः पण्यानां द्वादशोंशोऽत्र भूभुजा ॥
ग्राह्य इत्यादि यत्प्रोक्तं तत्तु तद्रक्षणाय हि ॥५२॥
चौरादिभ्योऽप्यरक्षन्यो भोगाशी नरकं व्रजेत् ॥
धर्मविप्लवमीशोऽपि योऽनिवार्य विहाय च ॥५३॥
गुरूक्तिं हन्ति लोभेन क्रुधा वा सोऽप्यधः पतेत् ॥
अदण्ड्यदण्डनाद्दण्ड्यादण्डनाच्चापि तादृशः ॥५४॥
एवमेकोऽन्यविश्वासात्कथं साधुफलं लभे ॥
श्रुत्वैवं तद्वचः प्रौढं धीमान्गर्गोऽवदन्नृप ॥५५॥
यद्येवं तर्हि योगीन्द्रं श्रीदत्तं शरणं व्रज ॥
निस्त्रैगुण्ये पथि सदा भक्तगुप्त्यै चरत्यमुम् ॥५६॥

अर्थ : नंतर कृतवीर्यानि पुत्राच्या सोळाव्या दिवशीं त्याचें अर्जून असे नामकरण केलें. नंतर कांहीं कालानंतर अर्जुनाचा पिता मृत्यू पावला. तेव्हा पौरजन अर्जूनास म्हणाले, " परंपरेनें प्राप्त झालेलें राज्य तूं कर " परंतु सर्व संस्कारांनीं परिपूर्ण झालेला अर्जून त्यांस म्हणाला, "राज्य करणे हे माझे स्वकर्म असूनही मी तें करणार नाहीं. कारण ते नरकाप्रत नेणारें आहे. भूमीचा षष्ठांश व व्यापाराचा बारावा भाग राजानें घ्यावा हे जे नेमून दिले आहे त्याचा उद्देश प्रजापालन करावें असा आहे. प्रजेचें चोरादिकांपासून रक्षण न करतां जो केवळ राज्योपभोग घेऊनच रहातो तो नरकासच जातो. जो अधर्मनिवारण करत नाहीं, अनिवार्य गोष्टींचा त्याग करतो, योग्य ठिकाणी शिक्षा करण्याची नीति (गुरुक्ति) लोभाने किंवा क्रोधानें टाळतो, त्याचा अधःपात होतो. अदण्ड्यांना शिक्षा, व दण्ड्यांना शिक्षा न करणें यामुळेही नरकच प्राप्त होतो. अशा रीतीनें नोकरांचाकरांवर विश्वास ठेवल्यानें मला चांगले फळ मिळणार नाही. " या प्रकारचे त्याचे प्रौढ युक्तिवादाचें वचन ऐकून गर्ग मुनि म्हणाले, " हे राजा, असे आहे तर योगीराज अशा श्रीदत्तात्रेयांना तूं शरण जा. भक्त-रक्षणासाठी तो सर्वकाळ निरनिराळी रुपें घेऊन पृथ्वीतलावर संचार करीत असतो.

तत्प्रसादादवाप्नोषि सम्यग्राज्यप्रशासने ॥
धृतिं शक्तिं मतिं चान्यात्प्रियं योगप्रभावतः ॥५७॥
योऽवतीर्णोमहीपृष्ठे सह्यसानुकृताश्रमः ॥
योगयुक्तो महात्मा स सर्वत्र समदर्शनः ॥५८॥
साक्षाद्विष्णुर्जगद्धाता तपोदीप्तोऽत्रिनन्दनः ॥
अनसूयागर्भरत्नं भक्तानामीहितार्थदः ॥५९॥
तमाराधय यत्नेन योगर्द्धिं ते प्रदास्यति ॥
ययेह बहुधाऽऽत्मानं कृत्वेष्टं साधयिष्यसि ॥६०॥
यमाराध्य सुरेन्द्रोऽपि स देवस्तत्प्रसादतः ॥
जम्भदैत्यं निहत्याशु हृतं पदमवाप सः ॥६१॥

अद्यापि सेवमानस्तं देवैर्देवर्षिभिः सदा ॥
भुंङक्ते धर्मेण धर्मात्मा राज्यं दिव्यमकण्टकम् ॥६२॥

अर्थ : श्रीदत्तात्रेयांच्या प्रसादानें (कृपेनें) तुला राज्यशासनांत योग्य असे धैर्य, शक्ति, बुद्धि व अन्य सर्व प्रिय गोष्टी योगप्रभावाने प्राप्त होतील. ज्यानें ह्या भूतलावर अवतार घेऊन सह्याद्री पर्वतावर आश्रम केला आहे, तो योगयुक्त, महात्मा, सर्वत्र समदृष्टी ठेवणारा, साक्षात् विष्णु, जगताचा पालनकर्ता, तपःप्रभावानें तळपणारा, अनसूयामातेचें गर्भरत्न, अत्रींचा पुत्र, आणि भक्तांचे ईप्सित पूर्ण करणारा असा आहे. तूं त्याची प्रयत्नपूर्वक आराधना कर म्हणजे तुला त्याचेकडून योगसामर्थ्य प्राप्त होईल. त्यामुळे तूं अनेक रूपे धारण करून एकाच वेळीं अनेक कार्ये करूं शकशील आणि धर्माने राज्यशासन करशील. श्रीदत्तात्रेयांचीच उपासना करून देवेंद्रानेसुध्दां त्यांच्या कृपेनें जम्भदैत्याचा वध करून आपलें गेलेलें स्थान (इंद्रपद) पुनः प्राप्त करून घेतलें. देवेंद्र अजूनही देव आणि देवर्षिंसह श्रीदत्तात्रेयांचें आराधन सर्वकाळ करून स्वर्गाचे राज्य निष्कंटकपणे धर्मयुक्त रीतीनें करीत आहे.

प्रभोराराधनं विद्धि दुष्करं दुर्धियामिह ॥
सुधीनां सुकरं राजन्नात्मभूतस्य तस्य हि ॥६३॥
यस्य गङ्गाम्भसि स्नानं भिक्षा च कमलालये ॥
सह्याद्रौ च निवासः स स्मृतिगामी क्षणेक्षणे ॥६४॥
सुदूरे योऽस्ति सततं विषयाकृष्टचेतसाम् ॥
सुधीनामन्तिके चास्य भजनात्किं न सिद्ध्यति ॥६५॥
येनैव सृज्यते विश्वं येनैतद्धार्यते पुनः ॥
संहर्तापि स एवाऽऽस्ते भक्त्या तं शरणं व्रज ॥६६॥
श्रुत्वैवमर्जुनः प्राह देवेन्द्रेणार्चितः कथम् ॥
एवंप्रभावो वेवोऽपि श्रद्दधानाय शंस मे ॥६७॥
आराधयाम्यहमपि तमेव मुनिसत्तम ॥
इत्यर्जुनेन संपृष्टो गर्गः प्राह स्मरन्विभुम् ॥६८॥

अर्थ : दुर्बुद्ध माणसांना प्रभु दत्तात्रेयाची आराधना दुष्कर आहे. परंतु ज्यांची बुद्धी चांगली आहे, त्यांना प्रत्यगभिन्नत्वामुळें, हे राजा, त्या दत्तात्रेयांची आराधना सुकर होते. ज्याचे स्नान गंगेत होतें, जो कोल्हापुरांत भिक्षा स्वीकारतो, सह्याद्री पर्वतावर रहातो, जो क्षणोक्षणी स्मरणकर्त्यापुढें उभा रहातो, विषयांचे ठिकाणीं ज्यांचे चित्त गुंतलेलें असतें त्यांना जो अतिशय अप्राप्य आहे, परंतु सद्भक्त, निर्मलचित्त अशा लोकांना जो अगदीं जवळ असतो, अशा श्रीदत्तात्रेयांच्या उपासनेनें काय बरें साध्य होणार नाहीं ? जो हें अखिल विश्व निर्माण करतो, त्याचें पालन करतो व नाशही करतो, त्याच श्रीदत्तात्रेयांना तू अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें शरण जा." वरील भाषण ऐकून अर्जुनानें प्रश्न केला, "श्रीदत्तात्रेयांची उपासना, पूजा देवेंद्रानें कोणत्या प्रकारे केली ? ते मला सांगावें. तसेंच एवढा मोठा प्रभाव या देवाचा आहे तर त्याचें सविस्तर वर्णन मला कृपा करून सांगावे. मीही श्रद्धायुक्त अंतःकरणाचा आहे. तसेंच, हे मुनिवरा त्या दत्तात्रेयांचीच उपासना करण्याची माझी इच्छा आहे." असें अर्जुनाचें भक्तियुक्त अंतःकरणाचें बोलणें ऐकून गर्गमुनींनी सर्वव्यापक श्रीदत्तात्रेयांचे स्मरण करून बोलण्यास प्रारंभ केला.

॥ इति कार्तव्यार्जुनचरितं नाम तृतीयाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

॥ अथ गर्गेण देवविजयकथनं नाम तृतीयाष्टके चतुर्थोऽध्यायः ॥

ॐ ॥ नतावनात्तसुभगव्रतोऽयं परमेश्वरः ॥
तल्लीलां श्रुणु भूपेन्द्रो यतोऽभीष्टार्थभागभूत् ॥१॥
स दैत्यो दैत्यराट् जम्भो देवेन्द्रोपि सदेवतः ॥
स्वर्गायायुध्यतान्योन्यं दिव्यवर्षं पुरा भृशम् ॥२॥
दैत्यैर्देवाः पराभूता गत्वोचुर्जीवमातुराः
दृष्टाः पराजयो नोऽद्य तत्किं कार्यमतः परम् ॥३॥
तानाश्वास्याह धिषणो दत्तात्रेयं तपोधनम् ॥
शरणं यात वरदः स कार्यं वः करिष्यति ॥४॥

इत्युक्तः सामरः शक्रः प्राप दत्ताश्रमं शुभम् ॥
तत्र देवं महात्मानमप्रतर्क्यं ददर्श सः ॥५॥
दिगम्बरमपि स्वाङ्के धृत्वा बालां दिगम्बराम् ॥
अनघां सुदतीं तन्वीं पानासक्तामपि स्थितम् ॥६॥

अर्थ : (ह्या अध्यायांत श्रीगर्गाचार्यांनी देवांचा महान विजय वर्णिला आहे. त्यानंतर अर्जुन गुरुंकडे गेला, आणि नम्रपणें नमस्कार करून अभिष्ट प्राप्ति करून घेता झाला.) श्रीगर्गमुनी म्हणाले, "हे अर्जुना, भक्तियुक्त अंतःकरणानें नम्र झालेल्यांचे रक्षण करण्याचे व्रत ज्यानें घेतलें आहे, तो हा श्रीदत्तात्रेय आहे. हे राजा, ज्या पासून इंद्राने अभिष्ट प्राप्त करून घेतले; त्या श्रीदत्तात्रेयांच्या दिव्य लीला तूं श्रवण कर. पूर्वी दैत्य राजा जंभासुर व देवेंद्र यांचें स्वर्गप्राप्तीसाठीं बराच कालपर्यंत आपसात युद्ध चालू होतें. जंभासुरास दैत्यांचे सहाय्य व देवेन्द्रास देवांचे साह्य होतें. त्या युद्धांत दैत्यांनी देवांचा पराभव केला. तेव्हां पराजित झालेले देव बृहस्पतीकडे जाऊन म्हणाले, "आमचा पराजय झालेला आपण पाहिलेला आहेच. तर आता आम्ही काय करावें ?" तेव्हां त्यांना आश्वासन देवून बृहस्पती म्हणाले, "तुम्ही सर्व श्रीदत्तात्रेयांस शरण जा, तो वरद असून तुमचे कार्य तडीस नेईल व शत्रूंवर विजय मिळवून देईल." हें वचन ऐकून देवांसह इंद्र शुभ अशा श्रीदत्तात्रेयांकडे येऊन पोंचला. तेथें त्यानें श्रीदत्तात्रेयांचे तर्कास न समजणारें असें रूप पाहिलें. दत्तात्रेय ब्राह्मण, किंवा क्षत्रिय, किंवा वर्णाश्रमी, किंवा गृहस्थ किंवा संन्यासी, यापैकी कोण आहे तें समजण्यासारखें नव्हतें. कारण ते नग्न असून त्यांच्या मांडीवर बाल अशी नग्न स्त्री बसलेली होती. ती निष्पाप, सुदंती, सुंदर देह धारण केलेली, आणि मद्यपान करण्यांत गढलेली होती.

दृष्टैवमपि ते चक्रुः सेवां सर्वेऽमराः सदा ॥
तिष्ठन्तमुपतस्थुस्ते प्रणाता यान्तमन्वगुः ॥७॥